गुंतवणूकदारांसाठी सुवर्ण संधी
महावीर पेन्शन ठेव योजना
1 लाख रुपये गुंतवणुक एक वर्षासाठी करा व मिळवा
दरमहा 833/- रुपये व्याज*
दि जैन मर्चन्टस् को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि.
श्री. संजय काठेड (संस्थापक) Mo. 9372444001
इमारत कंपनी, पोस्ट ऑफिस जवळ, कापड बाजार, अ.नगर. फोन नं. : 0241-2993900

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

सुवर्ण विश्वातील सर्वात जूनी.. विश्वसनीय व नामांकित पेढी...
मे. हरीभाकाजी देडगांवकर
Since 1935
सराफ ॲण्ड ज्वेलर्स
२५७१, एम.जी.रोड, कापड बाजार, अहमदनगर.
फोन : २३४६४४३. मो. ९८२२९९१०२४.

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, शनिवार दि. २८.०६.२०२५ | अंक नं. ७७ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

स्मार्ट असो वा मार्ट..मिल असो वा मॉल...
सर्वात स्वस्त देणार फक्त राजपाल !
आला रे आला राजपाल सेल आला..!
खरेदी | खरेदीवर पॉईंट | पॉईंटसवर गिफ्ट
30 ते 70% डिस्काउंट सेल
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

5gm सोन्याच्या सुवर्णखरेदीवर
स्क्रॅचकार्डव्दारे जिंका दुबई ट्रिप
किंवा आकर्षक गिफ्ट बॉक्स व सोबतच हमखास मजुरीवर भरघोस डिस्काऊंटही..
चलो दुबई + सोन्याच्या दागिन्यांच्या मजुरीवर 15%* पर्यंत सूट
Conditions Apply*
चंदुकाका ज्वेल्स सोनेरी नातं..
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02

घर गळत आहे का?
आकांक्षा वॉटर प्रुफिंग
एकदा वॉटर प्रुफिंग करत तर परत वॉटर प्रुफिंग करण्याची गरज भासणार नाही.
जर्मन टेक्नॉलॉजी मटेरियल
वॉटर प्रुफिंग कुलेक्टवर ५ वर्षे गॅरंटी
9518382902

# झाडाला लटकवलेल्या स्थितीत आढळला तरुणाचा मृतदेह

**अंगावर मारहाणीच्या खुणा, रक्तस्राव; पोलिसांना खुनाचा संशय**

नगर – नगर तालुक्यातील सारोळा कासार शिवारात शेतातील कडूनिंबाच्या झाडाला ३७ वर्षीय तरुणाचा मृतदेह लटकलेल्या अवस्थेत २८ जूनला सकाळी आढळून आला. त्याच्या डोक्याला व अंगावर मारहाणीच्या खुणा असून शरीरावर मोठ्या प्रमाणात रक्तस्राव झालेला असल्याने त्याला मारहाण करून खून करत पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने फासावर लटकवले असल्याचा पोलिसांचा संशय आहे.


पेजनसिंह विश्वकर्मा

टेंभी मंदिराच्या जवळ गट नंबर ७७५/१ या धामणे यांच्या शेतातील कडूनिंबाच्या झाडाला मृतदेह लटकलेला शेतकऱ्यांच्या निदर्शनास आला. त्यांनी ही माहिती पोलिसांना कळवताच सहाय्यक पोलिस निरीक्षक प्रल्हाद गिते घटनास्थळी दाखल झाले. त्यांच्यासमवेत पोलिस उपनिरीक्षक जयेश गांगुर्डे, भरत धुमाळ, पोलिस अंमलदार राहुल थोरात, शिवाजी माने, अन्सार शेख, बाबासाहेब खेडकर, विक्रांत भालसिंग, रवी सोनटक्के, मंगेश खरमाळे, पोपट गिते यांनी घटनास्थळी भेट दिली. मृतदेहाच्या शरीरावर प्रचंड रक्तस्राव झालेला होता. डोक्याला व पायाला जखमा होत्या. मृतदेह फक्त बनियन व अंडरवेअरवर होता. तो खाली घेतल्यावर त्याला ज्या पंच्याने लटकवलेले होते त्यात त्याचे आधारकार्ड, मतदान कार्ड व इतर कागदपत्रे मिळाली. त्यावरून त्याचे नाव पेजनसिंह कुंदनलाल विश्वकर्मा (वय ३७, रा. जमालपुरा, भोपाळ, मध्यप्रदेश) असल्याचे समोर आले आहे. पोलिसांनी त्याच्या कुटुंबियांशी संपर्क साधला असून त्याची ओळख पटली आहे. तो भोपाळवरून महाराष्ट्रात अहिल्यानगर जिल्ह्यातील सारोळा कासारमध्ये कसा आला, कुठे काम करत होता याचा शोध पोलिस घेत आहेत.


मृतदेह आढळून आल्यावर घटनास्थळी दाखल झालेले पोलिसांचे पथक.

विठ्ठल, विठ्ठल, विठ्ठला.. हरिओम विठ्ठला..
आषाढी एकादशीच्या महाउपवासासाठी
राजमोती साबुदाना
१ किलो । ५०० ग्रॅम । २५० ग्रॅम
एक्स्ट्रॉ सुपरफाइन साबुदाना
• इन्स्टंट साबुदानासुद्धा उपलब्ध!
RAJ MOTI
-: स्टॉकिस्ट :-
मे. कांतीलाल घेवरचंद शिंगवी
दाळ मंडई, अहमदनगर.
फोन : 2344823/9422220723
आजच आपल्या जवळच्या दुकानदाराकडे मागणी करा!

व्ही टाईप चे पंप
मिळण्याचे एकमेव ठिकाण
अभय सेल्स कॉर्पोरेशन ॲंड हार्डवेअर
ABHAY SALES CORPORATION & HARDWARE
Satbhai Mala, Shop No 8, Delhi Gate Rd, Near Gajanan Hospital, Ahilyanagar
9145008009 / 9822542011

BRANDED
जीन्स व फॉरमल पॅन्ट
₹ 500 ला एक
₹ 900 ला दोन
₹ 1200 ला तीन
*मर्यादित स्टॉक
भरपूर व्हरायटीज्
अहिल्यानगर शहरातील भव्य मॉल पुरुषांसाठी सर्व काही
शुभ मॉल
मयुरी लेडिज मॉलच्या वर
मल्हार चौक, आयकॉन पब्लिक स्कूल जवळ, आगरकर मळा, अहिल्यानगर. ९०२८२०११८८
Terms & Conditions Apply.

CERTIFICATE COURSE IN ADVANCE ACCOUNTING
COURSE DETAILS
COMPUTER APPLICATION
ADVANCE ACCOUNTING
TAXATION, BANKING
AUDITING
100% JOB ASSISTANCE
Experience Faculties | 1 Lac + Students Trained | Job Assistance
CAA IS NOT JUST A COURSE BUT A GREAT INVESTMENT IN YOUR CAREER
An ISO 9001:2015 Certified DiSHA COMPUTER INSTITUTE
Delhi Gate Branch: 1st Floor, 204, Anand Keshav Heights, Above Supekar Medical, Delhi Gate. 9371051769
Old ST stand Branch: 1st Floor, Amber Plaza, Near Lokmanthan Office, Near Maliwada Stand, Station Road. 9371151769
Pipeline Branch: Second Floor, Rucha Garden, Bhistbag Chowk, Pipeline Road. 7447761769

अभिष्टचिंतन शुभेच्छा..

आमचे प्रेरणास्त्रोत
मा.श्री.राजेंद्रजी चोपडा
आपणांस
वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा...
* शुभेच्छुक *
राजेंद्र चोपडा मित्र मंडळ
स्व. अरुणकाका जगताप मित्र मंडळ
स्विमिंग ग्रुप, अ.नगर क्लब
मार्केटयार्ड व्यापारी मित्र मंडळ
नगर अर्बन बँकेचे ठेवीदार व खातेदार

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# मनपातर्फे 'डेंग्यू मुक्त अहिल्यानगर' अभियान

### वसाहतींच्या परिसरातील पाणी साठ्याची तपासणी, नागरिकांशी संवाद; आयुक्तांच्या उपस्थितीत डास उत्पत्ती होणाऱ्या जागांची स्वच्छता

नगर - महापालिकेमार्फत सुरू करण्यात आलेल्या डेंग्यूमुक्त अहिल्यानगर अभियानाच्या तिसऱ्या आठवड्यात कोठला परिसरात कोंड्यामामा चौक परिसरात भेटी देऊन तपासणी करण्यात आली. आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांच्या उपस्थितीत परिसरातील वसाहतींमध्ये असलेले पाणीसाठे, टाक्या, हौद आदींची तपासणी करून त्यात बेट टाकण्यात आले. डेंग्यूच्या डासांची उत्पत्ती टाळण्यासाठी, प्रजनन साखळी तोडण्यासाठी आठवड्यातून एक दिवस कोरडा दिवस पाळावा, असे आवाहन यशवंत डांगे यांनी केले.



कोठला परिसरात महानगरपालिकेतर्फे डेंग्यू मुक्त अहिल्यानगर अभियान राबविण्यात आले.

यशवंत डांगे यांच्या उपस्थितीत हे अभियान राबविण्यात आले. यावेळी महापालिकेच्या आरोग्य विभागाचे प्रमुख डॉ. सतीश राजूरकर, आरोग्य केंद्राचे अधिकारी, कर्मचारी, नर्सेस, तसेच परिसरातील नागरिक उपस्थित होते. नागरी वसाहतीमध्ये पाण्याचे साठे तपासून त्यात औषध टाकण्यात आले. तसेच, पावसामुळे वसाहतीच्या परिसरातील टायर, इतर पडीक व टाकाऊ साहित्यांमध्ये साचलेले पाणी काढून स्वच्छ करण्यात आले.

डेंग्यू मुक्त अहिल्यानगरसाठी नागिरकांनी स्वतःहून अभियानात सहभाग घ्यावा. स्वतःच्या घराची तपासणी करावी. त्यात घरातील स्वच्छ पाणी साठविलेला हौद, बॅरल, छतावरील पाण्याची टाकी, अडगळीत पडलेले साहित्य व त्यात पावसाचे पाणी साठले आहे का याची तपासणी करावी. घरातील कूलर, तसेच जुन्या पध्दतीच्या फ्रिजमधील ट्रे तपासावा. त्यात डासाच्या अळ्या आहेत का, हे तपासावे. असल्यास ते रिकामे करावे. आपण स्वतःहून सहभाग घेऊन केलेल्या कामाचा, उपाययोजनेचा व्हिडिओ, फोटो महानगरपालिकेत सादर करावा. जे नागरिक सातत्याने स्वतःच्या घरापासून स्वतः सुरवात करतील व इतरांना करण्यासाठी प्रवृत्त करतील, त्यांचा मनपामार्फत सन्मान करण्यात येईल, असेही यशवंत डांगे यांनी म्हटले आहे. दरम्यान, हे अभियान २० आठवडे - ५ महिने राबविण्यात येणार आहे. पुढील आठवड्यात ५ जुलै रोजी सकाळी ८ वाजता डेंग्यू मुक्त मोहिमेच्या चौथ्या आठवड्याचे अभियान हनुमान मंदिर भोसले आखाडा या परिसरात पार पडणार आहे. स्थानिक नागरिकांनी यात सहभागी व्हावे, असे आवाहन यशवंत डांगे यांनी केले आहे.

## प्रेरणादायी अक्षरधन...




सानिया

### काही आत्मिक - काही सामाजिक - वाचनीय

एका आत्मिक व्यक्तित्त्वाची ओळख करून देणारा ललित लेखसंग्रह म्हणजे हे पुस्तक 'काही आत्मिक.. काही सामाजिक..'

लेखक जसजसे आपल्याला आवडू लागतात तसतसे त्यांच्या लेखन प्रक्रियेबद्दल, विचारशैलीबद्दल, त्यांच्यावर प्रभाव टाकणाऱ्या व्यक्तींबद्दल, अनुभवांबद्दल जाणून घ्यायची उत्सुकता बळावते.

खरंतर त्यांच्या कथा कादंबऱ्यांमधून आपल्याला ते लेखक उलगडत असतात पण त्यांनीच जर त्यांच्या वैचारिक, भावनिक घुसळणीविषयी अनौपचारिक काही लिहिलं तर वाचकांसाठी चार चाँदचद

लेखिका सानिया यांनी गेल्या ३० वर्षात विविध विषयांवर व अनेक निमित्ताने लिहिलेले असे काही लेख या पुस्तकात समाविष्ट केले आहगेत. पुस्तक साकारतांना काही लेखांचे पुनर्लेखन केले आहे. यात काही वैचारिक लेख आहेत तर काही चिंतनपर... काही व्यक्तिचित्रण कर काही लेख म्हणजे लेखिकेने स्वतःशी केलेला निखळ संवाद.. तर काही निव्वळ आठवणी!

एखादा लेख समाजशास्त्र विशेषज्ञाने लिहावा इतक्या गंभीर धाटणीचा, तर प्रिय मैत्रीण गौरी हिला लिहिलेला लेख डोळ्यात अश्रू उभा करणारा!

नामवंत लेखक मिलिंद बोकील यांची पुस्तकाला लाभलेली प्रस्तावना मोलाची भर घालते. ही प्रस्तावना इतकी सखोल व अभ्यासपूर्ण आहे की तिला समीक्षाच म्हणावं.

वाचकांच्या मनाचा ठाव घेणाऱ्या लेखिका सानिया सहज साधलेल्या संवादातून, वाचकांसोबत एक नवं नातं निर्माण करून त्यांना या लेखन प्रवासात सहप्रवासी करतात. लेखिका म्हणून अनेक वर्षे स्त्री-पुरुष, त्यांचे नात्यातले ताण, वर्तमानातले जगणे, त्यांच्या भोवतालची माणसे व गुंतागुंत त्या मांडत आल्यात.

# पोलिसांना टीप देण्याच्या संशयावरून आठ जणांकडून तिघा जणांना मारहाण

नगर - जनावरे कत्तल करण्याच्या व्यवसायाची पोलिसांना टीप देतो त्यामुळे आमच्यावर रेड पडून नुकसान झाले. ते भरुन दे असे म्हणून आठ जणांनी लोखंडी रॉड, लाकडी दांडके, लोखंडी फायटर व दगडाने बेदम मारहाण करुन २ तोळ्याचे सोन्याचे दागिने बळजबरीने घेऊन घरावर दगडफेक केल्याची घटना नगर तालुक्याचे जेऊर बायजाबाईचे येथे २५ जून रोजी सायंकाळी पाच वाजण्याच्या दरम्यान घडली.

याबाबत एमआयडीसी पोलीस ठाण्यात आवेज सलीम कुरेशी (वय. २१ रा. जेऊर बायजाबाईचे, ता. नगर) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की फिर्यादीचा भाऊ समशेर यास मुनाफ चांद शेख, व इकबाल मुनाफ शेख यांनी अडवले आणि आम्ही जनावरे कापण्याचा व्यवसाय करतो. त्याची टीप तुम्ही पोलिसांना देता त्यामुळे आमचे वर रेड पडून कारवाई झाली. त्यात आमचे जे नुकसान झाले ते भरुन द्या असे म्हणून फिर्यादीच्या भावास लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. त्यामुळे समशेर हा घाबरुन घरी आला. व त्याने फिर्यादी व त्याच्या आईस झाला प्रकार सांगितला. तोपर्यंत मुनाफ चांद शेख, इकबाल मुनाफ शेख, इमरान चांद शेख, मुजफ्फर चांद शेख, मुजाहिद हबीब शेख, सर्फराज हबीब शेख, साहिल जलील शेख, आदिल जलील शेख (सर्व रा. जेऊर बायजाबाईचे) हे फिर्यादीच्या घरी हातात लाकडी दांडके, लोखंडी रॉड, लोखंडी फायटर व दगड घेऊन आले आणि फिर्यादी, त्याचा भाऊ व आईस शिवीगाळ करुन बळजबरीने घरात घुसले व तिघांना मारहाण केली. मुजफ्फर शेख याने लाकडी दांडक्याने डोक्यात मारले, साहिल शेख याने लोखंडी फायटरने पाठीत मारले, तर आदिल शेख याने लोखंडी रॉडने मारहाण केली. या मारहाणीत फिर्यादीच्या डोक्याला, पायाला, पोटाला, हाताला मार लागला. त्यावेळी फिर्यादीची आई भांडण सोडवण्याकरीता मध्ये आली असता तिला सरफराज शेख, मुनाफ शेख व इकबाल शेख यांनी लाकडी दांडक्याने मारहाण करुन तिच्या गळ्यातील दीड तोळे वजनाचे सोन्याचे गंठण व कानातील सोन्याचे अर्धा तोळ्याचे टॉप्स बळजबरीने काढून घेतले. आणि लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. तसेच जाताना त्यांनी घरावर दगडफेक केली व आम्ही तुम्हाला मोहल्याचा राहून देणार नाही अशी धमकी दिली. या मारहाणीत तिघे जखमी झाले.

याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात आवेज कुरेशी याने दिलेल्या फिर्यादीवरुन आठ जणांविरुद्ध बी एन एस ११८ (१) १८९ (२) १९१ (३) १९०, ७४,११९ (१) ३३३ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

तपास पोलीस हवालदार आव्हाड हे करीत आहेत.

# विवाहितेवरील अत्याचाराच्या गुन्ह्यातील फरार आरोपीला राजस्थानमधून अटक

नगर - ओळखीचा फायदा घेऊन लग्नाचे आमिष दाखवून विवाहितेवर अत्याचार करुन फरार झालेल्या आरोपीस अखेर एमआयडीसी पोलिसांनी राजस्थान राज्यातील डिडवाना कुचामन जिल्ह्यातील बावडी येथून अटक केली.


विवाहितेवरील अत्याचाराच्या गुन्ह्यातील आरोपीला पकडल्यानंतर त्याच्यासमवेत एमआयडीसी पोलिसांचे पथक.

या बाबतची माहिती अशी की १३ मे २०२५ रोजी पिडीत महिलेने एमआयडीसी पोलीस ठाण्यात येथे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की देविलाल भुराराम केडोलिया (रा. बावडी, ता. मौलसर, जि. डीडवाना कुचामन, राज्य राजस्थान) याने, ओळखीचा गैरफायदा घेत, तिला फसवून नोव्हेंबर २०२३ ते डिसेंबर २०२४ या कालावधीत वारंवार शारिरिक अत्याचार केले. या प्रकरणी पोलिसांनी भारतीय दंड संहिता कलम ३७६, ३७६ (२) (एन) अंतर्गत गुन्हा दाखल केला होता. गुन्हा दाखल झाल्यानंतर आरोपी फरार झाला होता. मात्र, पोलिसांच्या चिकाटी व तंत्रज्ञानावर आधारित तपासामुळे सहायक पोलीस निरीक्षक माणिक चौधरी यांना माहिती मिळाली. मिळालेल्या माहितीनुसार आरोपी राजस्थानमध्ये असल्याचे समजले. पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथक तत्काळ राजस्थानकडे रवाना करण्यात आले. या पथकाने आरोपीचा शोध घेऊन, बावडी (राजस्थान) येथून त्याला ताब्यात घेतले असून त्याला या गुन्ह्यात अटक करण्यात आली आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे, उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल भारती (नगर ग्रामीण विभाग) यांच्या सूचनांवर व मार्गदर्शनाखाली सपोनि माणिक चौधरी यांचे सूचनेनुसार, पोसई विकास जाधव, पोलीस अंमलदार गणेश पालवे, राजेश राठोड, किशोर जाधव यांनी केली.

# कायद्यावालेच कायदा पाळत नाही मग सामान्य माणूस कसा पाळेल

### खाजगी वाहनावरील नंबर प्लेट सरकारी नियमांप्रमाणे असावी : श्रीनिवास बोज्ञा यांची मागणी



नगर - सर्रासपणे अनेक खाजगी वाहनावर महाराष्ट्र शासन, पोलीस असे लिहून महाराष्ट्र शासनाच्या नियमांची पायमल्ली करीत असल्याने त्या गाड्यावर कायदेशीर कारवाई करावी अशी मागणी श्रीनिवास बोज्ञा यांनी केली आहे.

मोटार वाहन अधिनियम १९८८ व इतर तदनुषंगिक नियमातील तरतुदी नुसार खाजगी वाहणावर महाराष्ट्र शासन अगर पोलीस लिहिणे बेकायदेशीर आहे व असा नियम असून याची माहिती संबंधित अधिकाऱ्यांना असूनही कोणी कारवाई करीत नाही. या समजूतीने सर्रासपणे खाजगी दुचाकी व चार चाकी या गाड्याचे नंबर प्लेटवर महाराष्ट्र शासन व पोलीस लिहिलेले आढळून येते व याचा गैरफायदा अनेक टोल नाक्यावर टोल बुडविण्यासाठी शासनाची गाडी म्हणून टोल वाचवण्याचे प्रयत्न ही करीत असल्याचे प्रखरतेने जाणवते. या साठी मोटार वाहन निरीक्षकांनी कायदेशीर अंमलबजावणी करावी अशी मागणी बोज्ञा यांनी केली आहे.

विशेष बाब म्हणजे पोलीस कारवाई करीत नाही म्हणून अनेक वाहनाचा पोलीस अगर महाराष्ट्र शासनाचा कोणताही संबंध नसतानाही असे नावे लिहिल्याचे निदर्शनास आले व या बाबत अधिक चौकशी केली असता गाडी पूर्वी पोलिसांची होती, महाराष्ट्र शासनाच्या अधिकाऱ्याची होती म्हणून नाव तसेच ठेवण्यात आल्याचे कळले सदर बाबही गंभीर आहे.

अनेक वाहनाच्या नंबर प्लेट व वाहणावर नोटरी पब्लिक भारत सरकार, वकील असेही लिहिल्याचे निदर्शनास आलेले आहे असे लिहिणे कायदेशीर आहे का? मोटार वाहन कायद्या प्रमाणे योग्य आहे का? जर नसेल तर या वाहणावरही कायदेशीर कारवाई करावी अशी मागणी श्रीनिवास बोज्ञा यांनी केली आहे.


डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण १५ दिवसाच्या आत करण्याच्या मागणीसाठी भीमसैनिकांच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढून निवेदन देण्यात आले.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा पुर्णाकृती पुतळा ११ जुलैपर्यंत खुला करा अन्यथा समस्त भीमसैनिक पुतळा खुला करून 'अनावरण' करणार

### पुतळा झाकून ठेवल्याने आयुक्त यांच्यावर अ‍ॅट्रॉसिटी कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करा

नगर - भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण १५ दिवसाच्या आत करण्याच्या मागणीसाठी समस्त भीमसैनिकांच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढून निवेदन देण्यात आले. यावेळी प्रतीक बारसे, सुशांत म्हस्के, निलेश गायकवाड, दया गजभिये, शैनेश्वर पवार, अनिकेत केदारे, निखिल सूर्यवंशी, सिद्धार्थ कांबळे, ज्योती पवार, सारिका गांगुर्डे, सारिका साळवे, संपदा म्हस्के, संदीप वाघमारे, सनी भिंगारदिवे, प्रशांत कदम, विकी भिंगारदिवे, अण्णासाहेब गायकवाड, योगेश गायकवाड, संतोष जाधव, अक्षय घाटेशाही, दानिश शेख, अजय बडोदे, योहान चाबुकस्वार, नईम शेख, प्रतीक जाधव, विजय गायकवाड, अक्षय शिंदे, हरीश अल्हाट, अतुल शिंदे, उमेश गायकवाड, सुशील म्हस्के, तुषार गायकवाड, आकाश शिंदे, नयन साळवे, हर्षद पेंढारकर, कार्तिक म्हस्के, सिसल भक्त, राहुल गाडेकर, सविता भालेराव, मनीषा गायकवाड, जयश्री गायकवाड, धनश्री चाबुकस्वार, ज्योती साठे, सागर पोळ, संघराज जगताप, रोहन सूर्यवंशी, विजय शिरसाठ, अजीम खान, विशाल गायकवाड आदीसह भीमसैनिक उपस्थित होते.

पुढे निवेदनात म्हटले आहे की, गेल्या ३ ते ४ महिन्यापासून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पूर्ण कृती पुतळा झाकून ठेवलेला आहे. १० एप्रिल २०२५ रोजी मनपा प्रशासनाने सदर पुतळ्याचे अनावरण करण्याचे निश्चित केले होते मात्र अचानक ठरलेला कार्यक्रम रद्द केला. खरंतर पुतळा झाकून प्रशासनाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा अपमान व विटंबना केलेली असुन मनपा आयुक्त यांच्यावर अ‍ॅट्रॉसिटी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करावा व १५ दिवसात म्हणजे ११ जुलैपर्यंत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा खुला करावा अन्यथा समस्त भीमसैनिक स्वतःच्या हाताने पुतळा खुला करून अनावरण करणार असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

# इंस्टाग्राम वर अश्लील व्हिडिओ व मेसेज टाकून तरुणीची बदनामी

नगर - सोशल मीडियाच्या इंस्टाग्राम वर बनावट इंस्टाग्राम धारकांनी २७ वर्षीय तरुणीच्या इंस्टाग्राम आयडीवर अश्लील व्हिडिओ व मेसेज टाकून तिला लज्ञा उत्पन्न होईल असे वर्तन करुन बदनामी केल्याची घटना ६ जून दुपारी २ ते १६ जून सायंकाळी ४ वाजण्याच्या दरम्यान घडली.

नगर शहर परिसरात राहणाऱ्या २७ वर्षीय तरुणीच्या इंस्टाग्राम आयडीवर ammu -lyyyyyyy8 आणि stanbolte 62 तसेच emiway -kk या बनावट इंस्टाग्राम आयडीवरुन फिर्यादी तरुणीस अश्लील व्हिडिओ व मेसेज पाठवले.

याप्रकरणी पीडित तरुणीने दिलेल्या फिर्यादीवरुन सायबर पोलीस ठाण्यात बनावट इंस्टाग्राम धारकाविरुद्ध माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० चे कलम ६६ (सी) ६७ ६७ (ए) प्रमाणे गुन्हा दाखल केला. पुढील तपास पोलीस निरीक्षक मोरेश्वर पेंदाम हे करीत आहेत.

# नगर शहरातील ओपन स्पेस विकास व देखभालीसाठी धोरण निश्चित करा

### महापालिका आयुक्तांकडे मागणी

नगर - शहरात महानगरपालिकेच्या मालकीचे असंख्य ओपनस्पेस आहेत. यापैकी अनेक ओपनस्पेसवर महानगरपालिकेने लाखो रुपये खर्च करून वॉकिंग ट्रॅक, खेळण्या, सुशोभीकरण आदी सुविधा निर्माण केलेल्या आहेत. मात्र या सुविधांचा जबाबदारीने वापर होत नसल्याने अनेक ओपनस्पेसची दुरावस्था झालेली दिसत आहे. त्यामुळे महापालिका हद्दीतील ओपनस्पेसचा विकास व देखभालीसाठी धोरण निश्चित करण्यात यावे, अशी मागणी हरिभूमी प्रतिष्ठानचे अध्यक्ष अभय ललवाणी यांनी महापालिका आयुक्त तथा प्रशासक यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात पुढे म्हटले आहे की, महानगरपालिकेच्या मालकीचे ओपनस्पेस विकसित करताना त्या ओपनस्पेसच्या कॉलनीतील बागकामाची आवड असणाऱ्या निसर्गप्रेमी रहिवाशांची संबंधित प्रभाग अधिकारी यांच्या अधिपत्याखाली ओपनस्पेस विकास व देखभाल समिती तयार करण्यात यावी. अशा प्रकारची ओपनस्पेस विकास व देखभाल समितीची निर्मिती झाल्यास लाखो रुपये खर्च करून विकसित केलेले ओपन स्पेस व त्यामधील सुविधा सुस्थितीत व सुरक्षित राहतील त्यांची दुरावस्था होणार नाही. त्यामुळे याबाबतचे धोरण निश्चित करण्यात यावे, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

निवेदनाची प्रत आमदार संग्राम जगताप यांनाही देण्यात आलेली आहे.

# पोस्टातील कर्मचाऱ्यास शिवीगाळ करत मारहाण

### एकाविरुद्ध गुन्हा दाखल

नगर - माझे पैसे खाल्ले असा आरोप करीत ४० वर्षी अनोळखी इसमाने पोस्ट कर्मचाऱ्यास शिवीगाळ करीत मारहाण करून धमकी देत सरकारी कामात अडथळा आणण्याची घटना २७ जून रोजी दुपारी मुख्य पोस्ट ऑफिस येथे घडली.

याबाबत संदीप निवृत्ती मिसाळ (वय ३५, रा. साईनगर तपोवन रोड अ.नगर) यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. दिलेल्या फिर्यादी म्हटले आहे की फिर्यादी हे अ.नगर मुख्य पोस्ट ऑफिस मध्ये क्लर्क आहेत. ते ऑफिसमधील खिडकी क्रमांक २ वर काम करत असताना, अंगाने मजबूत, बदामी पट्टा असलेला शर्ट व काळी पॅन्ट परिधान केलेला इसम अंदाजे ४० वर्षांच्या एका अनोळखी इसमाने अचानक माझे पैसे खाल्ले असा आरोप करत फिर्यादी यांना मारहाण केली, शिवीगाळ करत खुर्चीवरुन ओढून जिवे मारण्याची धमकी दिली.

यावेळी फिर्यादी यांचे सहकारी सुखदेव पालवे आणि आकाश ढाकरे यांनी हस्तक्षेप करत फिर्यादी यांची सुटका केली. त्या इसमाने गोंधळ घालत मोठ्याने ओरडत दहशत माजवण्याचा प्रयत्न केला. यावेळी फिर्यादी यांचे सहकारी यांनी डायल ११२ ला फोन करुन पोलिसांना घटनेची माहिती दिल्यावर पोलीस घटनास्थळी दाखल झाले. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात सदाशिव मिसाळ यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अनोळखी इसमाविरुद्ध बीएनएस १३२, ११५ (२), ३५१ (२), ३५२ प्रमाणे गुन्हा दाखल केला.

पुढील तपास सहायक फौजदार अमिना शेख करीत आहेत.

# रामेश्वर (बंडू) काळे यांचे अल्पश: आजाराने निधन

श्रीरामपूर - नेवासारोड येथील आकाश चायनीज सेंटरचे मालक व साई मंदिर ट्रस्टचे विश्वस्त रामेश्वर (बंडू) गंगाराम काळे (वय ४७) यांचे अल्पश: आजाराने निधन झाले.



त्यांच्या पश्चात पत्नी, दोन भाऊ, तीन बहिणी, एक मुलगा, एक मुलगी, पुतणे असा परिवार आहे. ड्रायक्लिनर्सचे मालक चिंतामणी काळे, हॉटेल चालक सुरेश काळे व चंद्रकांत काळे यांचे बंधू, चि.आकाश काळे यांचे वडील, अतुल अरुण काळे यांचे चुलते होत.

# मेडिकल दुकान फोडून रोख रकमेची चोरी

नगर - रात्रीच्या वेळी बंद मेडिकल दुकानाच्या शटरचे कुलूप कशानेतरी तोडून अज्ञात चोरट्याने दुकानातील दहा हजार रुपयांची रोकड चोरुन नेली. ही घटना २६ जून रोजी रात्री दहा ते २७ जून पहाटे साडेपाच वाजण्याच्या दरम्यान नगर तालुक्यातील साकत गावातील शौर्य मेडिकल दुकान येथे घडली.

याबाबत रोहित अर्जुन पवार (वय २६ रा. साकत, ता. नगर) याने नगर तालुका पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, फिर्यादी यांचे साकत गावात शौर्य मेडिकल नावाचे दुकान आहे. फिर्यादी यांनी २६ जून रोजी रात्री दहा वाजण्याच्या सुमारास नेहमीप्रमाणे दुकान बंद केले असता, चोरट्यांनी फिर्यादीच्या बंद दुकानाचे शटरचे कुलूप तोडून शटर उचकाटून आत प्रवेश केला. आतील सामनाची उचका पाचक करुन काउंटर मधील दहा हजार रुपये रोख रक्कम चोरुन नेली. याप्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात रोहित पवार यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अज्ञात चोरट्याविरुद्ध बी एन एस ३३१ (४) ३०५ (अ) प्रमाणेच गुन्हा दाखल केला पुढील तपास पोलीस हवालदार द्वारके हे करीत आहेत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गृहिणी

## आरोग्य

### आयोडीनची कमतरता असेल तर...

निरोगी राहण्यासाठी, तुमच्या आहारात अशा सर्व गोष्टींचा समावेश करणे खूप महत्वाचे आहे ज्यामुळे तुमच्या शरीरात पोषक तत्वांची कमतरता भासू नये. आयोडीन हे शरीराचा विकास करण्यास, ऊर्जा वाढवण्यास आणि चांगले मानसिक आरोग्य ठेवण्यासाठी फायदेशीर आहे. जेव्हा तुमच्या शरीरात आयोडीनची कमतरता असते तेव्हा तुमच्या थायरॉईड ग्रंथीचा आकार वाढू शकतो किंवा ती सूजू शकते. या समस्येला सामान्यतः गलगंड म्हणतात. जेव्हा तुमच्या शरीरात आयोडीनची कमतरता असते तेव्हा त्याचा थेट परिणाम तुमच्या मानसिक आरोग्यावर होतो. आयोडीनच्या कमतरतेमुळे, तुम्हाला लक्ष केंद्रित करण्यात अडचणी येण्यापासून ते नैराश्यापर्यंतच्या समस्यांना सामोरे जावे लागू शकते. त्याचप्रमाणे चयापचय खूप मंदावते. त्यामुळे तुमचे वजन झपाट्याने वाढू लागते. जर तुमचे वजन अचानक वाढू लागले तर तुम्हाला आयोडीनची कमतरता असू शकते. शरीरात आयोडीनची कमतरता असते तेव्हा थायरॉईड संप्रेरकाच्या निर्मितीवरही परिणाम होतो. आणि थकवा आणि अशक्तपणा होतो.

## पाककला

### टुटी फ्रुटी केक

**साहित्य :** मैदा एक कप, बेकिंग पावडर एक टीस्पून, बेकिंग सोडा अर्धा टीस्पून, दही अर्धा कप, कंडेन्स्ड मिल्क अर्धा कप, तेल १/४ कप, दूध १/४ कप, व्हॅनिला एसेन्स अर्धा टीस्पून, टुटी फ्रुटी अर्धा कप

**कृती :** सर्वात आधी ओव्हन १८० वॅटवर गरम करा. एका भांड्यात दही आणि कंडेन्स्ड मिल्क मिसळा. नंतर बटर किंवा तेल आणि व्हॅनिला एसेन्स घाला आणि फेटून घ्या. आता मैदा, बेकिंग पावडर आणि बेकिंग सोडा चाळून घ्या आणि त्यात घाला. आवश्यकतेनुसार दूध घालून एक गुळगुळीत बॅटर तयार करा. टुटी फ्रूटीला थोडे पीठ लावा आणि बॅटरमध्ये मिसळा, जेणेकरून ते स्थिर होणार नाही. ते एका ग्रीस केलेल्या टिनमध्ये ठेवा आणि ओव्हनमध्ये ३०-३५ मिनिटे बेक करा. टूथपिकने तपासा, जर ते स्वच्छ बाहेर आले तर केक तयार आहे.

## वास्तू

✻ प्लॉटचा किंवा घराचा आकार चौकोनी असावा. यात चारही कोन ९० अंशाचे असावेत. चौकोनी आकाराच्या घरामुळे धनलाभ होतो. चौकोनी आकाराची वास्तु सर्वांत उत्तम असते व त्यामुळे सुखी आनंदी व भरभराटीचे जीवन लाभते.

✻ स्नेक प्लॅटचे विशेष महत्त्व आहे. या प्लॅटला स्टडी रुम, लिव्हिंग रुममध्ये लावल्याने यशाचा मार्ग खुला होतो. घरात भरभराट होते.

✻ घरातील व्यक्तींनी वापरलेले जुने कपडे घरात फरशी वगैरे पुसण्यासाठी वापरल्यास घरात आजारपण येते.

✻ घरात सुगंध नसेल तर मन आणि वातावरण दोन्ही बिघडते.

## सल्ला

कोबीची भाजी उरली असेल आणि परत ती भाजी खायचा कंटाळा आला असेल तर ती गॅसवर परतून घेऊन त्यात डाळीचे पिठ १-१ चमचे घालून परतून घ्या आणि नेहमीप्रमाणे कणिक मळून कणकेत हे सारण स्टफ करून कोबीचे स्टफ्ड पराठे बनवा.

## सौंदर्य

अर्धा चमचा हळद आणि एक चमचा तांदळाचे पीठ आणि कोरफड जल हे तिन्ही एकत्र मिक्स करा आणि चेहऱ्यावर लावा आणि गोलाकार दिशेने संपूर्ण चेहऱ्यावर मसाज करा. याने त्वचेवरील व्हाईट हेड्स ब्लॅकहेड्स सहजपणे दूर होतात.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

रविवार, दि. २९ जून २०२५

**--, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, आषाढ शुक्लपक्ष, आश्लेषा ०६|३४, सूर्योदय ०६ वा. ३० मि. सूर्यास्त ०५ वा. ४१ मि.**

### राशिभविष्य

**मेष :** आज आपणास जास्त खर्च करावा लागू शकतो. आपले काम धाडसाने कराल. आपण ठरावीक वेळेत काम पूर्ण कराल.

**वृषभ :** एखादे नवे नाते आपल्यावर प्रभाव पाडेल. प्रवासाचे योग संभवतात. संस्था, संघटनेत महत्वाचे काम मिळू शकते. आरोग्य नरम-गरम राहील.

**मिथुन :** अनुकूलतेमुळे मन प्रसन्न राहील. परिश्रमाने कामाचे शुभ परिणाम येतील. प्रवासाचे योग संभवतात.

**कर्क :** संस्था, संघटनेत महत्वाचे काम मिळू शकते. आरोग्य उत्तम राहील. नवीन कार्यात, योजनांमध्ये यश मिळेल.

**सिंह :** आरोग्याची व खाण्या-पिण्याची काळजी घ्या. आर्थिक नुकसानाची शक्यता आहे. आरोग्य उत्तम राहील.

**कन्या :** नवीन कार्यात, योजनांमध्ये यश मिळेल. लांबचे प्रवास टाळा. जुन्या सहकाऱ्यांच्या गाठी-भेटी होतील.

**तूळ :** अपेक्षेनुसार कार्ये होतील. आरोग्य उत्तम राहील. मित्रांपासून, सहकाऱ्यांपासून लाभ मिळेल.

**वृश्चिक :** व्यापार-व्यवसायात स्थिती सुखद राहील. इच्छित कार्य थोड्या उशीरा होतील. कामात पूर्ण समर्पणभाव ठेवाल.

**धनु :** अनपेक्षित खर्च होण्याची शक्यता. महत्वाच्या व्यक्तींशी संपर्क येईल. सामाजिक प्रतिष्ठा लाभेल.

**मकर :** अडकलेली कामे योग्य वेळी पूर्ण होतील. राहते घर व जमिनीसंबंधी विषयांमध्ये स्थिती अनुकूल राहील.

**कुंभ :** नवीन कामे, योजना लाभदायक ठरतील. अडकलेली कामे आपल्या प्रयत्नांमुळे पूर्ण होतील. मानसिक सुख-शांतीचे वातावरण राहील.

**मीन :** महत्त्वाच्या कामांमध्ये आपणास घरच्यांचा पाठींबा मिळेल. नोकरीत असलेल्या व्यक्तींनी कार्यात सहकार्य घेऊन चालावे.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# शब्दगंध क्र. ७२०९ सौ.शैलजा कुलकर्णी




**आडवे शब्द :-** १) डोलीसारखे एक वाहन; शिबिका ३) समाजाविषयी ६) एक शास्त्र; केमिस्ट्री ८) सचोटीविषयीचा दुसऱ्याचा विश्वास १०) वचक; जरब; दरारा ११) एक लोककला; निर्लज्जपणाचे वर्तन १३) मोठे खटले १६) अर्धांगवायू; पक्षघात १८) फळातील रसाळ भाग; मगज १९) वडील; तात; पिता २०) तळलेला एक खमंग खाद्यपदार्थ २१) फणसाची एक जात २३) वृत्तपत्रात संपादकीय विभागात बातमीसंदर्भात काम करणारा २६) एक सुगंधी फूल

**उभे शब्द :-** १) भारतातील या रणांगणावर तीन ऐतिहासिक लढाया झाल्या २) एक पक्वान्न ३) एक दुचाकी वाहन ४) गळ्याची मागची बाजू; आदर ५) सकस; सत्त्वयुक्त ७) बिनथाटामाटाचा; अनलंकृत ९) गरममसाल्यातील एक पदार्थ १२) वनस्पती; वनस्पतिजन्य १४) तंगडी; चालताना दोन पावलांमधील जास्तीतजास्त अंतर १५) फणसाची एक जात १७) वर्दळ; शेत; राबता; रान; येणेजाणे १९) एक मराठी आडनाव २२) डोळ्याचे केस; डोळ्यावरचे कातडे २४) देह; शरीर; तन २५) हेतू; योजना

### शब्दगंध क्र. ७२०८ चे उत्तर



# ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ मुलांचे विश्व ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार :** विचार आणि पाणी नेहमी शुद्ध असावे कारण पाणी आरोग्य बिघडविते आणि विचार जीवन बिघडवतात.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### सोशल मीडियाचा मानसिक आरोग्यावर काय परिणाम होतो?

आजच्या डिजिटल जगात, सोशल मीडिया आपल्या जीवनाचा एक महत्त्वाचा भाग बनला आहे. रात्री झोपण्यापूर्वी आणि सकाळी उठल्यावर आपण प्रथम आपला फोन हातात घेतो. आपण आपले सोशल मीडिया हँडल तपासतो. ही इतकी सवय झाली आहे की ती सोडणे कठीण झाले आहे. सोशल मीडियाचा अतिरेकी वापर मानसिक आरोग्यावर वाईट परिणाम करतो. त्यामुळे अनेक प्रकारच्या समस्या निर्माण होतात.

घरी कुटुंबातील सदस्य असूनही, सोशल मीडियावर व्यस्त असलेले लोक एकाकीपणाचे बळी ठरतात. ते स्वतःला सोशल मीडियावर इतके व्यस्त ठेवतात की ते त्यांच्या कुटुंबातील सदस्यांशीही बोलत नाहीत. एक वेळ अशी येते जेव्हा ते त्यांचे मन कोणाशीही शेअर करू शकत नाहीत आणि जगापासून वेगळे वाटू लागतात. परिणामी ते एकाकीपणाचे बळी बनतात.

आजच्या काळात नैराश्याचे अनेक प्रकार समोर येतात, तुम्ही कधी विचार केला आहे का की यामागील कारण काय आहे? कुठेतरी सोशल मीडियावर जास्त वेळ घालवणे हे याचे एक मोठे कारण आहे. सोशल मीडियावर जास्त वेळ व्यस्त राहिल्याने लोकांना पुरेशी झोप मिळत नाही जी अनेक आजार आणि चिडचिडेपणाचे कारण आहे. काही लोक त्यांच्या फोनमध्ये इतके गुंतलेले असतात की त्यांना रात्र कधी सकाळ होते हे कळतही नाही. अशा परिस्थितीत दुसऱ्या दिवशी त्यांना थकवा, अशक्तपणा जाणवतो.

असे म्हटले जाते की केवळ आत्मविश्वासानेच माणूस यशाची शिडी चढू शकतो. त्याच वेळी, आजच्या काळात, लोकांमध्ये इतका आत्मविश्वास कमी असतो की ते त्यांचे मत कोणासमोरही मांडू शकत नाहीत. यामागील सर्वात मोठे कारण म्हणजे सोशल मीडिया, कारण लोकांना वाटते की हेच त्यांचे जग आहे. अशा परिस्थितीत, ते सोशल मीडियाशी जोडले जातात आणि वास्तविक जीवनापासून दूर जातात.

### विजेता

अनेक वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. एका तलावात अनेक बेडूक राहत होते. तलावाच्या मध्यभागी, एक खूप जुना धातूचा खांब होता जो त्या तलावाच्या बांधणी करणाऱ्या राजाने बसवला होता. खांब खूप उंच होता आणि त्याची पृष्ठभागही खूप गुळगुळीत होती. एके दिवशी, बेडकांनी शर्यत आयोजित करण्याचा विचार केला. शर्यतीत सहभागी होणाऱ्या स्पर्धकांना खांबावर चढावे लागेल आणि जो वरच्या टोकावर प्रथम पोहोचेल तो विजेता मानला जाईल.

तसेच शर्यतीचा दिवस आला, आजूबाजूला खूप गर्दी होती; जवळपासच्या भागातील अनेक बेडूक देखील या शर्यतीत सहभागी होण्यासाठी पोहोचले. आता शर्यत सुरू झाली. पण खांब पाहून गर्दीत जमलेल्या बेडकांपैकी कोणालाही विश्वास बसत नव्हता की कोणताही बेडूक शिखरावर पोहोचू शकेल आणि जो बेडूक प्रयत्न करत होता तो थोडा वर जायचा आणि खाली पडायचा, दोन-तीन वेळा पडूनही अनेक बेडूक प्रयत्न करत होते. पण उत्साहित बेडूकही निराश झाले आणि त्यांनी त्यांचा प्रयत्न सोडून दिला.

पण त्या बेडकांमध्ये एक लहान बेडूक होता, जो वारंवार पडल्यानंतरही त्याच उत्साहाने वर चढण्याचा प्रयत्न करत होता. तो सतत वर जात राहिला आणि शेवटी तो खांबाच्या शिखरावर पोहोचला आणि या शर्यतीचा विजेता ठरला. त्याच्या विजयावर सगळेच आश्चर्यचकित झाले, सर्व बेडूक त्याच्याभोवती उभे राहिले आणि विचारू लागले, ''तुम्ही हे अशक्य काम कसे केले, तुमचे ध्येय साध्य करण्याची शक्ती तुम्हाला कुठून मिळाली, आम्हालाही सांग की तू हा विजय कसा मिळवला?''

तेव्हा एक बेडूक म्हणाला, ''तुम्ही त्याला का विचारताय, तो बहिरा आहे.''

**तात्पर्य :** सभोवतालच्या नकारात्मकतेमुळे स्वतःला कमी लेखू नये.



## जीवन का अमृत (भाग १)

### सामाजिक आचरण और नैतिक जीवन

सत्संग पवित्र शिक्षाओं का सार रहा है और मैं हमेशा प्यारे भाई-बहनों को, यहाँ भी और विदेशों में भी जोर देकर कहता हूँ कि वे सत्संग को कभी नहीं छोड़ें, क्योंकि इन सुनहरी क्षणों मे आप परमानंद और अमरत्व के स्रोत के पास होते हैं, पवित्र शिक्षाओं का सही अर्थ समझते हैं और प्रभुत्व के अनूठे सद्गुणों को धारण करते हैं, क्योंकि इसका वातावरण सद्गुरु की जीवनदायी तरंगों से ओत-प्रोत होता है। सत्संग वह पवित्र जगह है, हाँ रूहानी पहलवान बनाए जाते हैं। यह अमृत का झरना है, जो प्रभु के परमानंद का नशा प्रदान करता है और जहाँ जाति, वर्ग, रंग और देश के सभी भेद खत्म हो जाते हैं। हम सभी प्रभु के नाम में भाई-बहन हैं और हम एक पिता, एकस के हम बारिक के दैवी सद्गुण को धारण करें।

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

### आज्ञा चक्र

हम जो दवाईयां खाते हैं उनका इतना सूक्ष्म रूप बनता है तब जा कर रोगों का इलाज होता है। दवाईयां अर्थात प्रकृति इतना सूक्ष्म रुप धारण करती है जो आत्मा के सूक्ष्म कणों को शक्तिशाली बनाती है जिस से हम तंदरुस्त हो जाते हैं। दवाइयों का इतना सूक्ष्म रुप दिमाग के विभिन्न हिस्से बनाते हैं। इन हिस्सों को आत्मा ही निर्देश देती है। जब बैटरी डिस्चार्ज हो जाती है तो चार्जर से लगाने पर चार्जर की विद्युत बैटरी की छड़ो पर जमी कार्बन उतार देती है तथा बैटरी चार्ज हो जाती है। ऐसे ही जब हम बाबा को याद करते हैं तो इतने सूक्ष्म रुप में बाबा की तरंगों के सम्पर्क में आते हैं बाबा की तरंगे हमारे मन की तरंगों से अशुद्धि निकाल देती हैं अर्थात आत्मा की कार्बन निकल जाती है और हम

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## साहित्य सहवास - 'दर्शन...'

अमिताभ बचन यांची भूमिका असलेला चित्रपट सुमारे चाळीस वर्षापूर्वी पाहिला होता. अमिताभच्या लहानपणीची भूमिका करणारा बालकलाकार एक वस्तु घेऊन जोराने पळतो आहे आणि पुढच्या काही सेकंदात टांग्याच मोठं चाक जमिनीवरुन धावतांना लगेच पुढच्या काही सेकंदात मोठा झालेला अमिताभ रस्त्यावरून धावतांना दाखवला आहे. खरं तर हे दिग्दर्शन आहे. टांग्याचं मोठं चाक आणि मोठा झालेला अमिताभ हे प्रतिकात्मक दाखवलं. पडद्यावर मोठा अमिताभ दिसताच टाळ्या आणि शिट्ट्यांनी थिएटर दणाणुन गेलं. खरं तर दर्शन हा शब्द दिसणं याशी संदर्भात आहे. आपल्या लाडक्या अमिताभचं दर्शन मोठ्या पडद्यावर होताच तुम्हाला आनंद झाला कारण अन्याय, अत्याचारांच्या विरोधात लढणारा नायक आलेला पाहून अनेकांना मनापासून आनंद झाला.

एखादी व्यक्ती दुसऱ्या एकाला तुमचं बऱ्याच दिवसांत दर्शन नाही. असं म्हणाली तर म्हणणाऱ्या व्यक्तीला काय म्हणायचं आहे हे आपल्या लक्षात येतं. एखाद्या निसर्गरम्य ठिकाणी आपण गेलो, तेथे मुक्कामी असतांना ज्या रुममध्ये आपण राहणार आहोत त्या रुमची खिडकी उघडतो आणि आपल्याला खूपच छानशा निसर्गराजाचं दर्शन झालं तर आपल्याला खूप आनंद होतो, खूप छान वाटतं. अर्थात दर्शन ही सुखावणारी क्रिया आहे. एखाद्या मंदिरात गेल्यानंतर तेथील देवाचं दर्शन घेतलं की मनाला छान वाटतं, प्रसन्न वाटतं. दर्शन हा शब्दच मुळात देव ह्या शब्दाशी जोडलेला आहे. दर्शन हे फक्त व्यक्तीचं असतं असं नाही तर पुस्तकातील शब्दांचं दर्शन सुध्दा असतं. मी एक पुस्तक वाचतांना त्यात पुढील भाग छापलेला होता- 'आपण एखादी कृती करण्यापूर्वी दोन वेळा विचार करावा पण कृती केल्यानंतर दोन वेळा विचार करून काहीही उपयोग नाही.

एकदा निघुन गेलेली वेळ पुन्हा दुसऱ्या दिवशी त्याचवेळी येईल पण ह्यासाठी तुमच्या आयुष्यातले २४ तास निघुन गेलेले असतील. तेहतीस शब्दांचे मिळुन दोन वाक्य पण ते तेहतीस शब्द वाचल्यानंतर होणारी ज्ञानवृध्दी ही आपले डोळे उघडणारी, चांगल्या अर्थाच्या शब्दांचा संग्रह असणारे दर्शन असणारना? एखाद्या व्यक्तीला पाहिलं की आपल्याला मनापासून आनंद होतो तर एखाद्या व्यक्तीला टाळण्याचा प्रयत्न केला जातो. ह्या दोन्ही व्यक्तींचा ज्यावेळी विचार करू तेव्हा लक्षात येईल की एखाद्याचं दिसणं हे आपल्यासाठी आनंददायी असतं, सकारात्मक प्रेरणादायी असतं तर एखाद्याचं दिसणं नको वाटणं ग्रामध्ये त्या व्यक्तीचं बोलणं, वागणं, राहाणं... एकंदरित आपल्यादृष्टीने वाईट चा प्रकारातलं असतं. आपण जेव्हा झाडाचं रोप लावतो मायेनं खतपाणी घालतो आणि जेव्हा ते झाड मोठं होऊ लागतं तस तसं त्या झाडाचं दर्शन आपल्याला छान वाटु लागतं. निसर्ग आपल्याला कायमचं देत आला आहे. निसर्गाच्या ऋणातुन आपण कधीच उतराई होऊ शकणार नाही.

निसर्गाच्या ऋणात राहुया. निसर्गाच्या विरोधात जाण्याऐवजी निसर्गासोबत राहिलो तर भविष्य काळातलं आपलं दर्शन निश्चितच चांगलं असणार ह्यात शंका नाही. आषाढी एकादशी जवळ येऊ लागते तेव्हा लाखो वारकऱ्यांना पांडुरंगाच्या दर्शनाची ओढ लागते. कधी एकदा विठु माऊलीचं दर्शन घेईन, डोळे भरून पाहिन असं लाखो वारकऱ्यांना होतं. विठुमाऊलीच्या दर्शनाची ही ओढ अगदी अंतकरणापासून असते, वर्षानुवर्षे आजही आणि ह्यापुढेही दर्शनाची ही तीव्र ओढ असणारंच आहे. पावसाळ्यात ढगांमुळे अनेकदा सूर्यदर्शन दुर्मिळ होतं.

थेंबा थेंबाच्या रुपात पडणारा पाऊस हवा हवासा वाटु लागतो तेव्हा पावसाच्या दर्शनाची ही ओढ आतुरता वाढवते. जेव्हा एखादं दृष्य नाटक, एकांकिकेत पाहिलं जातं. अथवा चित्रपटात पाहिलं जातं तेव्हा त्या दृष्याचा अर्थातच दर्शनाचा योग्य तो प्रभाव आपल्या मनावर पडतो. 'साहित्य सहवास' च्या माध्यमातुन आजपर्यंत ५५० पेक्षा अधिक लेख, लघुकथांच्या माध्यमातुन चांगलं काय आणि वाईट काय, मी आपण काय काय करु शकतो ? आपल्यातली जिगर, आत्मविश्वास समाजात भोवताली घडणाऱ्या घटना ह्यांव्दारे अनेक विषयांचं दर्शन वाचकांना घडवलं आहे. 'साहित्य सहवास' वाचल्यानंतर जेव्हा एखादा वाचक फोन करून आवडल्याचं कळवतो तेव्हा त्या

वाचकाला मी ओळखतही नसतो तरीसुध्दा त्याच्या प्रसन्न चेहऱ्याचं दर्शन मला होतं. मी वाचन करतांना शब्दांचं दर्शन होतं तसं ह्यामधुन मी काय घ्यायला हवं ह्याचंही दर्शन होतं.

(लेख क्र.५५६)

**- सुनील राऊत** माळीगल्ली, भिंगार, अहिल्यानगर मो.९८२२७५८३८३

## हसा आणि शतायुषी व्हा!

पिंटू आणि बंडू नाश्त्याला हॉटेलमध्ये जातात

**पिंटू :** बंड्या, तू समोश्यामधील भाजीच का खात आहेस?

**बंडू :** कारण माझी आई म्हणते, बाहेरचे काही खाऊ नये!

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

✻ भारतरत्न पुरस्कार द्यायला कधी पासून सुरुवात झाली?

- २ जानेवारी १९५४

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आयुर्वेदीय बालसंस्कार

### आजी-आजोबांची साथ

मुलांना जवळ घेऊन गोष्टी, संस्कत श्लोक, अक्षर उजळणी असे जे शक्य असेल ते करून घ्यावे. आजी-आजोबांना टीव्ही बघायचा असेल, तर शक्यतो नातवंडे झोपल्यावर किंवा शाळेत गेल्यावर बघावा. कारण टीव्हीचे दुष्परिणाम लहान वयातील मुलांवर फार होतात, अगदी कनातवंडांसोबत बघायचाच असेल, तर त्याच्या वयाला योग्य असा कार्यक्रम बघावा. कि मुलगा व सुनेने देखील आई-वडिलांच्या कष्टाची जाणीव ठेवून त्यांच्याशी आदराने के आपुलकीने संवाद साधावा. ऑफिसमधून आल्यानंतर आपल्या मुलांची जबाबदारी शक्यतो आपणच स्वत: घेण्याचा प्रयत्न करावा

(क्रमश:)

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# इंडस्ट्रीयल वर्क्स म्हणजेच औद्योगिक क्षेत्रातील बांधकामाविषयी



औदयोगिक क्षेत्र हे एखाद्या शहराच्या विकासाचा कणा असतो आणि शहराचा जलद गतीने विकास होण्यासाठी तेथील तरुण पिढीचा रोजगार उपलब्ध होण्यासाठी शहरातील औद्योगिकरणाचा महत्वाचा सहभाग असतो. देशातील प्रत्येक राज्यात औद्योगिक प्राधिकरणाची स्थापना झालेली असून त्यांच्या नियंत्रणाखाली राज्यातील जिल्हा आणि तालुक्यात शहरातील इंडस्ट्रीयल झोनमध्ये औद्योगिकरणासाठी विविध व्यवसायांना चालना देण्याचे काम केले जाते. या औद्योगिकरणाच्या उभारणीमध्ये बांधकाम क्षेत्राचा महत्वाचा सहभाग असतो. त्यामध्ये सदर फॅक्टरी उभारणीसाठी प्लॅनमंजुरी पासून बांधकाम, कम्प्लिशन आणि नंतर फॅक्टरी चालू असतानाच्या काळातील मेंटेनन्स या कामांचा सहभाग असतो.

**औद्योगिक क्षेत्रातील कामे व रहिवासी कामे यातील फरक :** रेसिडेन्शीयल म्हणजेच रहिवासी कामात मुख्यत्वे आर सी सी प्रकारात केल्या जाणाऱ्या कामाचा अंतर्भाव होतो तर इंडस्ट्रीयल वर्क्स म्हणजेच औद्योगिक क्षेत्रातील बांधकामात स्टील स्ट्रक्चर्स व इंडस्ट्रीयल शेडची कामे मोठ्या प्रमाणात होतात. रहिवासी कामांपेक्षा औद्योगिक क्षेत्रातील कामांमध्ये सदर काम वेळेत आणि वेगात पूर्ण करणे त्याचबरोबर कामाचा अत्युच्य दर्जा सांभाळण्यास प्राधान्य दिले जाते. वेगवेगळ्या प्रकारची उत्पादने निर्मिती त्यांचे विविध वेंडर आणि सप्लायर एकमेकांवर अवलंबून असल्याने एकाच जागी सर्व औद्योगिक निर्मिती प्रकल्प असल्यास दळणवळण, वेळेची बचत या गोष्टी सहज साध्य होतात. त्यामुळे औद्योगिक सेक्टर वेगळे असणे फायद्याचे आणि सर्वाना सोयीस्कर ठरते.

**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे कार्य :** इंडस्ट्रीयल सेक्टर मध्ये एखादया कामाची सुरुवात करण्याआधी औदयोगिक प्राधिकरणाची प्रचलित नियमानुसार परवानगी घेणे बंधनकारक असते. औद्योगिक काम अथवा तत्सम कामे इंडस्ट्रीयल झोनमध्येच करणे आवश्यक (लघु उद्योग वगळता) असून ज्यामुळे रेसिडेंन्शीयल झोन म्हणजेच रहिवासी क्षेत्रास तेथे होणारे ध्वनी प्रदूषण, पाणी आणि वायू मधील प्रदूषणाचा त्रास होऊ नये, हा मुख्य उद्देश असतो. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची स्थापना यासाठी केलेली असून हा विभाग इंडस्ट्रीयल डेव्हलपमेंट योग्य पद्धतीने होण्यावर नियंत्रण ठेवणे तसेच त्यांना विविध सुविधा पुरविणे यासाठी कार्यरत आहे. या अंतर्गत इंडस्ट्रीयल झोनसाठी चांगल्या दर्जाचे रोड, नियमित इलेक्ट्रिसिटी, दळणवळण व्यवस्था, तरुण पिढीला व्यवसाय सुरु करण्यास चालना देणाऱ्या सरकारच्या विविध योजना राबविणे, सबसिडी देणे हि कामे केली जातात.

**बांधकाम परवानगीसाठी आवश्यक गोष्टी :** महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ याक्षेत्रात नवीन उद्योग सुरु करताना महाराष्ट्र पोल्युशन कंट्रोल बोर्ड (MPCB) आणि फायर विभागाची ना हरकत घेणे बंधनकारक करते त्याचबरोबर ऑटो डीसीआर अंतर्गत ऑनलाईन बांधकाम परवानगी जलद गतीने कामास प्रोत्साहन देते. यामध्ये प्लॉट साईझप्रमाणे आणि वापराप्रमाणे नियमावली असून आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून ऑनलाईन बांधकाम परवानगी घेऊन कामास सुरुवात करता येते. बांधकाम परवानगी घेतल्यावर मर्यादित काळात कामास सुरुवात करून ते पूर्ण करणे बंधनकारक असते अन्यथा बांधकाम परवानगी रद्द करण्याचे अधिकार प्राधिकरणाला असतात. MIDC पोर्टलवर नोंदणीकृत वास्तूविशारद अथवा अभियंते यांच्यामार्फत प्लान दाखल करून आणि आवश्यक नोंदणी आणि विकास शुल्क भरून कामास परवानगी मिळते.

**औद्योगिक क्षेत्राचे फायदे :** प्रकल्पासाठी गुंतवणूक रु. १ कोटी पेक्षा कमी असेल तर ते लघुउद्योग अंतर्गत येतात तर गुंतवणूक रु. १ कोटी पेक्षा जास्त असेल तरते लार्ज स्केल अंतर्गत मोडतात. राज्य शासन काही क्षेत्र SEZ स्पेशल इकॉनॉमिकल झोन अंतर्गत विकसित करू शकते जेणेकरून त्या भागात रोजगार उपलब्ध होण्यास आणि तेथील विकास होण्यास मोठ्या प्रमाणात चालना मिळू शकते. फूड इंडस्ट्रीसाठी काही औदयोगिक क्षेत्र राखीव ठेवले जातात. औद्योगिक विकासास चालना मिळण्यासाठी प्रत्येक तालुक्यांमध्ये काही भाग इंडस्ट्रीयल झोन साठी फक्त राखीव न ठेवता त्यांचा विविध उद्योगाच्या माध्यामातून विकास करून रोजगार निर्मिती करणे आवश्यक असून त्यामुळे मोठ्या शहरांकडे आकर्षित होणारी युवा पिढी आपल्या तालुक्यात व्यवसाय सुरु करून योग्य मार्गाला लागू शकेल.

**औद्योगिक क्षेत्रातील बांधकाम पद्धती :** MIDC मध्ये जलद गतीने काम करण्यासाठी अत्याधुनिक मशिनरीचा वापर करण्यास प्राधान्य दिले जाते. यासाठी पी ई बी स्ट्रक्चर्स म्हणजेच शेडचे प्लिंथ लेव्हल पर्यंत काम पूर्ण होईपर्यंत फॅक्टरी मध्ये त्यासाठी लागणाऱ्या ट्रस (कैच्या) दिलेल्या मापाप्रमाणे बनवल्या जातात आणिजागेवर आणून नट बोल्ट फिटिंग करून अगदी काही दिवसात आपले स्ट्रक्चर पूर्ण होते. त्याचबरोबर क्रेन, हायड्रा, जेसीबी, पोकलन, व्हायब्रेटर, ब्रेकर, जेसीबी व ट्रॅक्टर ब्रेकर, काँक्रीट करण्यासठी मिक्सर, लिफ्ट, अजॅक्स मशीन अश्या विविध आधुनिक साधनांचा वापर केला जातो. क्वॉलिटी कामासाठी आरएमसीद्वारे काँक्रीट केले जाते, ज्यामुळे हजारो सिमेंट गोण्यांचे काम एका दिवसातही सहज शक्य होते. कामातील अचूकतेसाठी आणि मोठ्या आकाराच्या शेडचे सेंटर लाईन अथवा प्लॉट मार्किंग काम मॅन्युअली अचूक होणे शक्य नसल्याने टोटल स्टेशन मशिनचा प्रभावी वापर केला जातो.

**सेफ्टी प्रीकॉशन :** MIDC अंतर्गत इंडस्ट्रीयल वर्कमध्ये कामगार सुरक्षिततेला सर्वाधिक महत्व दिले जाते. बांधकाम चालू असताना आणि पुढे कंपनीचे उत्पादन चालू झाले तरी यासाठी विशिष्ट नियमावली कामगारांना केलेली असते. त्यासाठी काम करताना हेल्मेट, सेफ्टी श्युज, सेफ्टी सूट तसेच आवश्यक असेल तिथे सेफ्टी बेल्ट वापरणे, उंचीवरील कामासाठी सेफ्टी नेटचा वापर त्याचबरोबर आवश्यक ठिकाणी सेफ्टी बाबत काळजी घेण्याबाबत निर्देश असलेले बोर्ड सर्व कंपन्यामध्ये हमखास दिसतात. लेबर इन्सुरन्स काढून घेणे त्या कॉन्ट्रॅक्टरला बंधनकारक असते. कोणी गेस्ट कंपनी व्हिजीटसाठी अथवा थोड्या वेळेसाठी कंपनीच्या आत प्रवेश करणार असतील तर त्यांनाही हे नियम पाळावे लागतात. यासाठी प्रत्येक कंपनी मध्ये गेटवर सेक्युरिटी गार्ड आणि टीम तैनात असते. इंडस्ट्रीयल सेक्टरमध्ये आग लागण्याचे प्रमाण रहिवास क्षेत्रापेक्षा जास्त असते, त्यामुळे लघु उद्योग ठिकाणी फायर extinguisher ची व्यवस्था करणे आवश्यक असूनलार्ज स्केल इंडस्ट्रीमध्ये फायर हायड्रंटवॉटर लाईन मार्फत अंतर्गत फायरसाठी वॉटर लाईन टाकलेल्या असतात.

**ट्री प्लांटेशन (वृक्षरोपण):** MIDC अंतर्गत होणाऱ्या प्रदूषणामुळे आणि वृक्ष तोडीमुळे त्यांना त्या प्रमाणात वृक्षारोपण करणे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ आणि प्रदूषण निर्मुलन विभागाने बंधनकारक केलेले आहे. त्यामुळे बऱ्याच कंपनीमध्ये गार्डन चांगल्या प्रकारे विकसित करून त्यांचे संवर्धन केले जाते, यासाठी विविध लँडस्केप आर्किटेक्ट टीम काम करतात. ज्यामुळे होणाऱ्या प्रदूषणाची नुकसानभरपाई करून वातावरण प्रदूषणमुक्त ठेण्याचे काम या वृक्ष संवर्धनाने केले जाते.

**इंडस्ट्रीयल सेक्टरसाठी स्पेशल सुविधा :** MIDC मधील कारखान्यात लाईट सप्लाय गेल्यास आणि चालू असलेलीउत्पादन निर्मिती अचानक बंद झाल्यास मोठे नुकसान होऊ शकते त्यामुळे तेथे वेगळ्या एक्स्प्रेस फिडर लाइनची व्यवस्था केलेली असते ज्यामुळे अवितरत इलेक्ट्रिसिटी चालू असते. MIDC साठी पाण्याच्या वेगळ्या लाईन टाकलेल्या असून त्यांची वेगळी फायर वॉटरसप्लाय सिस्टीम असते तसेच आगीपासून संरक्षणासाठीहायड्रंटवॉटर लाईन टाकलेल्या असतात. इंडस्ट्रीयल सेक्टर मधील रोड जड वाहतुकीमुळे चांगल्या दर्जाचे आणि नियमित मेंटेन केलेले आपणास दिसतात. इंडस्ट्रीयल सेक्टर मध्ये ऑफिस स्पेस, कामगार आणि अधिकारी यांना मुक्कामी राहण्यास रहिवासी क्षेत्र तसेच शॉप आणि हॉटेलसाठी जमीन आरक्षित ठेवलेली असते.

**इंडस्ट्रीयल सेक्टरमधील बांधकामाचे वेगळेपण :** MIDC मधील कामे करताना सर्वाधिक महत्व हे वेळेवर बांधकाम पूर्ण करण्यास दिले जाते कारण काम पूर्ण करून युनिट चालू करण्यास होणारा एक दिवसाचा उशीर लाखो रुपयांचे कंपनीचे नुकसान होण्यास कारणीभूत ठरू शकतो. यासाठी येथे दिवसरात्र कामे चालू असल्याचे आपणास निदर्शनास येते. इंडस्ट्रीयलमधील कामे प्राधान्याने पी ई बी स्ट्रक्चर्समधील शेड असतील तरी आर सी सी स्ट्रक्चर्स ऑफिस बिल्डींग यांचीही कामे यामध्ये केली जातात. ग्यांट्री गर्डरक्रेन बऱ्याच शेड मध्ये साहित्य वाहतुकीसाठी बसविल्या जातात. ट्रीमिक्स फ्लोअरींगचा जास्त प्रमाणात वापर होतो. छतासाठीपूर्वी ए सी शीट (सिमेंट पत्रे) वापरली जात होती आता प्रीकोटेड एम एस पत्रे मोठ्या प्रमाणात वापरली जातात. शेडची साईज, त्यातील तयार होणाऱ्या उत्पादनासाठी आवश्यक असणाऱ्या गोष्टी यावर कशा प्रकारे बांधकाम करावे याचा प्लॅन, स्टील स्ट्रक्चर डीझाइन आणि काम करण्याची पद्धती ठरवली जाते.

**इंडस्ट्रीयल सेक्टरमधील मेंटेनन्स :** MIDC मधील कामे करत असताना मोठ्या कंपन्यामध्ये नियमित काहीतरी मेंटेनन्सची कामे नियमित चालू असतात. खाली उत्पादन निर्मिती चालू असताना उंचीवरील शेडमध्ये आतील बाजूस सिलिंग लगत सेफ्टी नेट लाऊन वरील पत्रे बदलण्यासारखी कामे केली जातात. अश्या प्रकारची रिस्क अथवा धोका टाळण्यासाठी मुख्य काम करतानाच जास्तीत जास्त लक्ष देणे गरजेचे असते. त्यामुळे इंडस्ट्रीयल सेक्टरमध्ये उत्पादन निर्मिती होत असतानामेंटेनन्सची कामे करणे हा नित्य नियमाचा भाग बनला आहे. काही एजन्सी अथवा इंजीनिअर्स हे पूर्णवेळ अथवा मुख्य व्यवसाय हा इंडस्ट्रीयल सेक्टरमध्ये मेंटेनन्सची कामे करणे म्हणून करतात.

**इंडस्ट्रीयल सेक्टरमधील वास्तू विशारद आणि अभियंते यांना आगामी काळात संधी :** सध्याच्या काळात इंडस्ट्रीयल सेक्टरमध्ये झपाट्याने वाढ होत असून या माध्यमातून वास्तू विशारद आणि अभियंते यांना मोठमोठे बहुराष्ट्रीय कंपन्यांचे प्रोजेक्ट करण्याची संधी देणारे ठरत असून यामुळे रोजगार निर्मिती बरोबर, शहर विकास आणि तांत्रिक पद्धतीने बांधकाम करणारी नवीन पिढी विकसित होत आहे. लँडस्केप आर्कीटेक, इंटेरीअर डिझायनर, स्टील स्ट्रक्चर आणि आर सी सी डिझायनर यांचाही येथील कामामध्ये महत्वाचा सहभाग असतो. तसेच लायजनिंग एजन्सी, प्लॅनिंग करणारी आर्किटेक्ट फर्म, जागेवर प्रत्यक्षात काम करणारी इंजीनिअर आणि त्यांच्या विविध लेबर एजन्सी अशी एक साखळी इंडस्ट्रीयल सेक्टरयोग्य पद्धतीने वाढीत दिशादर्शक काम करते. त्यामुळे आर्किटेक, इंटेरीअर आणि इंजीनिअर यांना आगामी काळात इंडस्ट्रीयल सेक्टरमध्ये आपले करिअर करण्याची सुवर्णसंधी आहे.

आदित्य कन्स्ट्रक्शन्स ही फर्म मागील २५ वर्षापासून नगरमध्ये बांधकाम कार्यरत आहे. आमच्या फर्म मार्फत इंडस्ट्रीयल शेडस, रेसिडेन्शीयल बांधकामे, प्रायव्हेट बंगले, रो बंगले स्कीम, अपार्टमेंटची कामे हि जलदरीत्या पूर्ण केली जातात व करत आहोत. तसेच आदित्य कन्स्ट्रक्शन्स ही फर्म क्वॉलिटीबाबत कुठल्याही प्रकारची तडजोड करत नाही तसेच ग्राहकांचे समाधान हीच आमच्या यशाची गुरुकिल्ली आहे.

**– इंजि. दादासाहेब एस. बेरड**

**DCE, BE Civil, मोबा.– ९८२२०३३०३२.**

**मेल आयडी – srujanengineers@gmail.com**

**इंजीनिअर, डिझायनर, प्लॅनर अ‍ॅण्ड व्हॅल्यूअर (एसा सभासद)**

**फर्म – आदित्य कन्स्ट्रक्शन्स**



**ऑफिस पत्ता – ऑफिस नं. ४, गुरुदत्त रेसिडेन्सी, नगर– सोलापूर रोड, भारत सॉ मिल समोर, दरेवाडी, अहिल्यानगर.**

WE CREATE THE WORLD Reg. No. Mah/1363/1987 F 1300/1066/ANR

आर्किटेक्टस्, इंजिनिअर्स अ‍ॅण्ड सर्व्हेअर्स असोसिएशन, अहिल्यानगर

www.aesanagar.com

AESA Architects, Engineers & Surveyors Association Ahilyanagar

# अहिल्यानगर गौरव दिनाच्या कार्यक्रमातून विचार भारतीने प्रेरणादायी विचार व नवे पायंडे समाजात रुजवले : सुजय विखे

**पालकमंत्री सांस्कृतिक महोत्सव व अहिल्यानगर गौरव दिनाच्या कार्यक्रमांची आढावा बैठक**



पालकमंत्री सांस्कृतिक महोत्सव व अहिल्यानगर गौरव दिन कार्यक्रमाच्या आढावा बैठकीत बोलताना डॉ.सुजय विखे.

नगर – विचार भारतीने पालकमंत्री सांस्कृतिक महोत्सव व अहिल्यानगर गौरव दिनाची मांडलेल्या संकल्पनेला जनसेवा फाउंडेशनने साथ देत शहरत वेगळे वातावरण निर्माण केले. यानिमित्त काढण्यात आलेल्या शोभायात्रेने नवा इतिहास रचत नवे पायंडे पाडले आहेत. सर्व संयोजकांनी मनापासून केलेल्या उत्कृष्ट नियोजनामुळे ना भूतो असा हा महोत्सव यशस्वी झाला आहे. भविष्यात या महोत्सवाची व्याप्ती अजून वाढवणार आहे. विचार भारतीने प्रेरणादायी विचार या कार्यक्रमांच्या माध्यमातून समाजात रुजवले आहेत. पाडलेले नवे पायंडे समाजासाठी परिवर्तनीय ठरतील, असे प्रतिपादन डॉ.सुजय विखे यांनी केले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त अहिल्यानगर शहरात विचार भारती व जनसेवा फाउंडेशनच्या वतीने २९ ते ३१ मे दरम्यान पालकमंत्री सांस्कृतिक महोत्सव व अहिल्यानगर गौरव दिननिमित्त कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये झालेले सर्व कार्यक्रम गाजले व स्पर्धा यशस्वी झाल्याबद्दल सर्व विभागांच्या संयोजकांचे आभार मानण्यासाठी आयोजित आढावा बैठकीत डॉ.विखे बोलत होते. यावेळी स्वागताध्यक्षा धनश्री विखे, विचार भारतीचे मार्गदर्शक राजाभाऊ मुळे, भाजपाचे शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते व कार्याध्यक्ष राजेंद्र पाचे आदी उपस्थित होते. यावेळी संयोजन समितीच्या सदस्यांना अहिल्यादेवी होळकर यांची मूर्ती देऊन सन्मान करून आभार मानण्यात आले.

या कार्यक्रमात डॉ.विखे यांनी त्यांची पत्नी धनश्री विखे यांचे विशेष कौतुक केले. ते म्हणाले, पालकमंत्री सांस्कृतिक महोत्सव व अहिल्यानगर गौरव दिनाच्या कार्यक्रमांच्या स्वागताध्यक्ष पदाची जबाबदारी धनश्री विखे यांनी उत्कृष्टपणे सांभाळून त्यांच्यातही चांगले नेतृत्व गुण असल्याचे दाखवून दिले आहे. विचार भारतीमुळे हे मला समजले. त्यामुळे विचार भरतीचे मी आभार मानतो.

धनश्री विखे म्हणाल्या, अहिल्यानगर गौरव दिनाच्या कार्यक्रमांच्या स्वागताध्यक्ष पदाची मोठी जबाबदारी माझ्यावर आली. पण सर्वांनी उत्कृष्ट साथ देत सर्व कार्यकम यशस्वी करून दाखवले आहेत. पालकमंत्री सांस्कृतिक महोत्सव व अहिल्यानगर गौरव दिनाचे कार्यक्रम पाहून मन प्रसन्न झाले. वैशिष्ट्यपूर्ण उत्कृष्ट नियोजन व लयबद्धपणे झालेल्या कार्यक्रमांनी वेगळीच उंची गाठली. यामुळे ज्या उद्देशाने या कार्यक्रमांचे आयोजन केले तो साध्य झाला. विश्व मांगल्य सभा निर्मित 'राष्ट्र समर्थ देवी अहिल्या की पुण्यगाथा' या गाजलेल्या हिंदी नाटकास महिलांसह प्रेक्षकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. अहिल्यादेवींचे कार्य घराघरात जाण्यासाठी व आदर्श आई घडवण्यासाठी विश्व मांगल्य सभा काम करत आहे. या संस्थेची राज्याची जबाबदारी माझ्यावर आहे. यामाध्यमातून अहिल्यानगरमध्ये मोठे काम सुरु करत आहे. या कार्यात सर्व महिलांनी सहभागी व्हावे, असे आवाहन केले.

राजाभाऊ मुळे म्हणाले, अहिल्यानगर गौरव दिनानिमित्त खास निर्मित केलेल्या अहिल्यानगर गौरव गीत सर्वत्र खूप गाजत आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी एका रीलसाठी हे गाणं बॅकग्राऊंड म्युझिकला ठेवले होते. या गीताची लोकप्रियता वाढत असल्याने हे लोकगीत होणार आहे. हे या कार्यक्रमाचे यश आहे, असे सांगून निर्मलवारी संकल्पनेची माहिती दिली.

कार्याध्यक्ष राजेंद्र पाचे यांनी यशस्वी महोत्सवाच्या अयोजाने एक आदर्शवत टीम वर्क झाले असल्याचे सांगून सर्वांचे कौतुक केले. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात निखील वारे यांनी ३ दिवस चाललेल्या कार्यक्रमांचा आढावा घेत विचार भारती व जनसेवा फाउंडेशनचे आभार मानले. या बैठकीत प्रा.अशोक सागडे यांनी वक्तृत्व स्पर्धेची माहिती दिली. अशोक डोळसे यांनी चित्रकला स्पर्धेची माहिती दिली. गौतम मुनोत यांनी अहिल्यानगर गौरव गीताची माहिती दिली. चंद्रकांत तागड यांनी स्टॅच्यू ऑफ वूमन एम्पॉरमेंट प्रकल्पाची माहिती दिली. प्रसाद सुवर्णपाठकी यांनी सांस्कृतिक महोत्सवाची माहिती दिली.

सूत्रसंचालन विचार भारतीचे सचिव सुधीर लांडगे यांनी केले. धनंजय जाधव यांनी आभार मानले. यावेळी विचार भारतीचे अध्यक्ष अरुण कुलकर्णी, अरविंद पारगावकर, प्रा.शिरीष मोडक, माजी नगरसेवक, विचार भारतीचे व जनसेवा फाउंडेशनचे पदाधिकारी उपस्थित होते.

# 'श्री गुरूमाऊली विद्यालया'चा २९ जूनला 'सन्मार्गम् कलाविष्कार' वार्षिक महोत्सव

नगर – श्री गुरूमाऊली संगीत विद्यालयाच्या वतीने २९ जून रोजी सावेडीच्या माऊली सभागृहात सायंकाळी ४.३० वाजता 'सन्मार्गम्' या वार्षिक महोत्सवचे आयोजन करण्यात आल्याची माहिती विद्यालयाच्या संचालिका सौ. वर्षा पंडित यांनी दिली.

महोत्सवात भरतनाट्यम या शास्त्रीय नृत्यप्रकारातील संपूर्ण मार्गम हा कलाविष्कार सादर करणार आहे. यात वर्षा पंडित या सर्व शाखांच्या विद्यार्थीनी समवेत सादर करणार आहेत.

या कार्यक्रमास विशेष अतिथी म्हणून ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. शरद कोलते, रामायणाचार्य ह.भ.प गोरक्षनाथ दुतारे महाराज, राजेंद्र चोपडा, चिंतामणी हॉस्पिटलचे डॉ. सी. बी. कुलकर्णी, डॉ. सौ. गौरी कुलकर्णी, डॉ. सुधा कांकरिया, अशोक गांधी, भारत भारतीचे अध्यक्ष कमलेश भंडारी, ज्येष्ठ संगीततज्ञ कुमुदिनी बोपर्डीकर, शिरूरच्या डॉ. स्मिता कवाद, डॉ. रुपाली मगर, उद्योजिका शुभा बोगावत आदी उपस्थितीत राहणार आहेत.कार्यक्रम सर्वासाठी विनामूल्य खुला असुन रसिकांनी कार्यक्रमाचा आस्वाद घ्यावा, असे आवाहन विद्यालयाचे चंद्रकांत पंडित यांनी केले आहे.

# सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल पतसंस्थेच्यावतीने जिल्हा उपनिबंधक (सहकार) मंगेश सुरवसे यांचे स्वागत



सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल पतसंस्थेच्या वतीने जिल्हा उपनिबंधक (सहकार) मंगेश सुरवसे यांचे स्वागत करताना यावेळी पतसंस्थेचे व्हाईस चेअरमन अभय पितळे, संचालक शांतीलाल गुगळे, संतोष गांधी, शैलेश गांधी, प्रमोद डागा, प्रशांत भंडारी, चेतन भंडारी आदी.

नगर – सहकार महर्षी सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल पतसंस्थेच्या वतीने नगरचे जिल्हा उपनिबंधक (सहकार) मंगेश सुरवसे यांचे स्वागत करून सत्कार करण्यात आला. यावेळी पतसंस्थेचे व्हाईस चेअरमन अभय पितळे, संचालक शांतीलाल गुगळे, संतोष गांधी, शैलेश गांधी, विनित बोरा, चेतन भंडारी, सरव्यवस्थापक प्रशांत भंडारी, सभासद प्रमोद डागा, संजय बोगावत आदी उपस्थित होते.

अभय पितळे यांनी स्वागत करताना म्हटले की, सुवालाल गुंदेचा जैन ओसवाल पतसंस्थेला उत्कृष्ट कारभाराची जवळपास २५ वर्षांची परंपरा आहे. सर्व सभासदांचा अतूट विश्वास असल्याने जास्तीत जास्त बँकिंग सुविधा देण्यात संस्था अग्रेसर आहे. संस्थेच्या भविष्यातील वाटचालीत सुरवसे यांचे मार्गदर्शन उपयुक्त ठरेल. सुरवसे यांनी संस्थेच्या मुख्य कार्यालयास सदिच्छा भेट देऊन शिस्तबद्ध कामकाजाची प्रत्यक्ष माहिती घ्यावी असे आवाहन त्यांनी केले.

मंगेश सुरवसे म्हणाले की, नगर जिल्ह्यास सहकाराची पंढरी म्हणून ओळखले जाते. सहकार महर्षी सुवालाल गुंदेचा यांनी स्थापन केलेली जैन ओसवाल पतसंस्थेने आदर्शवत कारभार करून सहकारातून नावलौकिक मिळविला आहे. या पतसंस्थेच्या भविष्यातही वाटचालीस प्रशासन नेहमीच सहकार्य करेल अशी ग्वाही त्यांनी दिली.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या मिळकतीच्या विक्रीचा व्यवहार केलेला आहे. **सदर मिळकत हि विद्यमान मालक यांचे मालकीची असुन** त्यांच्याच प्रत्यक्ष कब्जात व ताब्यात आहे. सदर मिळकत पुर्णपणे निर्वेध, निजोखमी आहे असा खरेदी देणाराने म्हणजेच विद्यमान मालकाने खात्री व भरवसा दिला आहे. तथापि कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, सदर मिळकतीबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा गहाण, दान, बक्षीसपत्र, अव्वल जप्ती, बॅक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीज, इजमेंट अगर इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून **७ दिवसांचे** आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे नकलासह आम्हास कळवावे व आमची खात्री करुन द्यावी. तसेच हरकत न कळवीता परस्पर वर्तमान पत्रातुन जाहिर केलेल्या हरकतींची काही एक दखल घेतली जाणार नाही मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहे त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहे असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मग कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक – २८/०६/२०२५

**परिशिष्ट मिळकतीचे वर्णन**

जिल्हा अहिल्यानगर (अहमदनगर), पोटतुकडी नगरपैकी, **महानगरपालिका** हद्दीतील **मौजे चाहुराणा बुद्रुक** येथील खालील वर्णनाची शेतजमीन मिळकत

| सर्व्हे / गट नंबर | क्षेत्रफळ | आकार |
|---|---|---|
| ५२ / ड | ० हे. ६ ३आर. | २रु.४३पै. |

हि संपुर्ण मिळकत.

**यांसी चतु:सीमा –**

पूर्वेस : सर्व्हे / गट नंबर ५२ / ई
दक्षिणेस : चाहुराणा खुर्द शिव
पश्चिमेस : नगर पुणे हायवे
उत्तरेस : सर्व्हे / गट नंबर १३४/१

**सदर मिळकतीचे विद्यमान मालक–**
**१. श्री विशाल विनायक पवार**
**२. कुसुम विनायक पवार**
**३. प्रियांका विनायक पवार**
सर्व रा. माणिकनगर, अहिल्यानगर (अहमदनगर).

**अ‍ॅड. प्रणव सुधीर धर्माधिकारी**
**अ‍ॅड. सौ. नुतन प्रणव धर्माधिकारी**
मो.नं.९०२८००८२००
पत्ता – भंडारी सावज अपार्टमेंट, कोठीरोड, अहिल्यानगर (अहमदनगर)

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्टात नमुद केलेली मिळकत विद्यमान मालक **१. अमिनाबी फकीर मोहंमद मनियार,** रा. मल्हार चौक, मशीद जवळ, स्टेशन रोड, अ.नगर, **२. शकिल फकीर मोहंमद मनियार,** रा. मल्हार चौक,मस्जीद जवळ, अ.नगर, **३. फरजाना रियाज मनियार,** रा. हडपसर पुणे. **४. जावेद फकीर मोहंमद मनियार,** रा. मनियार चाळ, स्टेशन रोड, अहमदनगर, **५. आसीफ फकीर मोहंमद मनियार,** रा. स्टेशन रोड, मल्हार चौक,अहमदनगर, **६. तमीजबी दादामियाँ मनियार,** रा. रोहीत कॉम्प्लेक्स, आनंद नगर मल्हार चौक, अहमदनगर, **७. खलील दादामियाँ मनियार,** रा. आनंद नगर, मल्हार चौक, अहमदनगर, **८ . निसार दादामियाँ मनियार,** रा. आनंद नगर, मल्हार चौक,स्टेशन रोड,अहमदनगर, **९. अतिक दादामियाँ मनियार,** रा. ब्राम्हण गल्ली, राशिन, ता. कर्जत, जि.अ.नगर, **१०.महेमुद लतीफ शेख,** रा. मनियार गल्ली, तळेगाव रोड, ता. राहता, जि. अ. नगर, **११. मुन्नावर लतीफ शेख,** रा. मनियार गल्ली, तळेगाव रोड, लोणी खुर्द, ता. राहता, जि. अ. नगर, **१२. जाकेरा बबलू मनियार,** रा. अतार गल्ली, निमोण ता. संगमनेर, जि.अ.नगर, **१३. रेश्मा लतीफ शेख,** रा. मनियार गल्ली, तळेगाव रोड, लोणी खुर्द, ता. राहता, जि. अ. नगर, **१४. ईरफाना सलीम मणियार,** रा. नागपूर चाळ एअरपोर्ट रोड, येरवडा पुणे. **१५. लाईक अहमद बाबासाहब मनियार,** रा. आनंद नगर , मल्हार, चौक, अहमदनगर, **१६. शबनम अकील अत्तार,** रा. दापोडी रेल्वे गेट जवळ सिध्दार्थ नगर, दापोडी,पुणे. **१७.रिजवाना बाबामिया मणियार,** रा. आनंद नगर, मल्हार चौक, अहमदनगर, **१८. मतिन बाबामिया मनियार** रा. आनंद नगर,मल्हार चौक,अहमदनगर, **१९. अफ्रिन अमजद मणियार,** रा. आनंद नगर, मल्हार चौक, अहमदनगर यांच्या मालकीची असुन सदर मिळकतीचा व्यवहार आमच्या अशिलांबरोबर ठरलेला असुन, आमच्या अशिलास विद्यमान मालक यांनी रजिस्टर साठेखताचा दस्त देखील लिहून नोंदवून दिलेला आहे व लवकरच खरेदीखत होणार आहे. सदर मिळकत निर्वेध व निजोखमी आहे असे खरेदी देणाराचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही कोणतीही तक्रार राहु नये म्हणून या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, **कोणाचेही कोणत्याही प्रकारे मालकी हक्क, हितसंबंध, ताबा, साठेखत, करारनामा, मनाई, दावा, लिज, गहाण, दान, बक्षिस, पोटगी हक्क व इतर कोणतेही हक्क हितसंबंध असल्यांस** त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाले पासुन ७ (सात) **दिवसांचे** आत खालील दिलेल्या पत्त्यावर संपुर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकती खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे अगर हरकत चालणार नाही, असल्यास त्यांनी जाणीवपुर्वक सोड्न दिले आहे समजण्यांत येईल याची नोंद घेण्यांत यावी.

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन** – जिल्हा अहिल्यानगर (अहमदनगर), पोटतुकडी व तालुका अहिल्यानगर (नगर) पैकी, अहिल्यानगर (अहमदनगर) महानगरपालिका हद्दीतील **मौजे शहर अहिल्यानगर** येथील **माळीवाडा भागातील** खालील वर्णनाच्या मिळकती –

अ) सिटी सर्व्हे नंबर ४५६४ – क्षेत्रफळ ४६.०० चौ.मीटर

ही संपुर्ण जागा व त्यावरील तळमजल्यावरील बांधकाम क्षेत्र ७. ७ चौ.मी. ही संपुर्ण बांधकामासह मिळकत.

**यासी चतु:सिमा–**
पुर्वेस – सिटी सर्व्हे नं. ४५६५, दक्षिणेस – रस्ता,
पश्चिमेस – सिटी सर्व्हे नं. ४५६३, उत्तरेस – बोळ,

ब) सिटी सर्व्हे नंबर ४५६५ – क्षेत्रफळ २७.६० चौ. मीटर

ही संपुर्ण जागा व त्यावरील बांधकाम क्षेत्र ७.७ चौ.मीटर ही संपूर्ण मिळकत.

**यासी चतु:सिमा–**
पुर्वेस – सिटी सर्व्हे नं. ४५६६, दक्षिणेस – रस्ता,
पश्चिमेस – सिटी सर्व्हे नं. ४५६४, उत्तरेस – बोळ,

क) सिटी सर्व्हे नंबर ४५७३ – क्षेत्रफळ ७६.९० चौ. मीटर

ही संपुर्ण जागा व त्यावरील तळमजल्यावरील सांगवाणी बांधकाम क्षेत्र ३९.७४ चौ.मी. ही संपुर्ण बांधकामासह मिळकत

**यासी चतु:सिमा–**
पुर्वेस – बोळ, दक्षिणेस – सिटी सर्व्हे नं. ४५७४,
पश्चिमेस – सिटी सर्व्हे नं. ४५८०/१, उत्तरेस – सिटी सर्व्हे नं. ४५८०/२

दि. २८/०६/२०२५.
अहमदनगर.

**अ‍ॅड. तनवीर एम. शेख**
नोटरी पब्लिक (भारत सरकार)
गोविंदपुरा, अहमदनगर
मो.नं. ९२७०४६४६००

**अ‍ॅड. गुफरान एफ. मोमीन**
**अ‍ॅड. मोहसीन आय. शेख**
कस्तुरी प्लाझा, डावरे गल्ली, अहमदनगर
मो.नं. ८०८७७४२४२८, ९२०९५९७१५०



भाजपाच्या प्रभाग ११ व १२ मधील पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत बोलताना शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते. समवेत गीता गिल्डा, ज्ञानेश्वर काळे, भरत ठुबे, सचिन जाधव, मयूर बोचूघोळ आदींसह पदाधिकारी.

# अहिल्यानगर महापालिकेवर भाजपाचाच झेंडा फडकावण्यासाठी कटिबद्ध होत तयारीला लागा

### शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते यांचे आवाहन

नगर – भारतीय जनता पार्टीच्या प्रदेश पदाधिकाऱ्यांनी माझ्यावर जो विश्वास व्यक्त करत शहर जिल्हाध्यक्षपदी केलेली नियुक्ती सार्थ ठरवत शहरात पक्ष संघटन अधिक मजबूत करणार आहे. शहरात पक्षाच्या बळकटीसाठी जुन्या–नव्या पदाधिकाऱ्यांची सांगड घालून शहराची भक्कम बूथ रचना करत आहे. येणाऱ्या निवडणूक पूर्ण ताकदीने लढून मनपावर भाजपाचाच झेंडा फडकावण्यासाठी कटिबद्ध होत तयारीला लागा, असे आवाहन शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते यांनी पदाधिकाऱ्यांना केले.

भारतीय जनता पार्टीच्या प्रभाग ११ व १२ मधील पदाधिकाऱ्यांच्या वतीने तसेच प्रदेश सचिव गीता गिल्डा परिवाराच्या वतीने आयोजित कार्यक्रमात अनिल मोहिते बोलत होते. या कार्यक्रमात सावेडी मंडल अध्यक्ष सीए ज्ञानेश्वर काळे, केडगाव मंडल अध्यक्ष भरत ठुबे, भिंगार मंडल अध्यक्ष सचिन जाधव, मध्य मंडल अध्यक्ष मयूर बोचूघोळ यांची निवड झाल्याबद्दल सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या.

प्रास्ताविकात गीता गिल्डा म्हणाल्या, पक्षश्रेष्ठींनी शहर जिल्हाध्यक्ष व मंडळ अध्यक्षपदी योग्य व्यक्तींची निवड केली आहे. या सर्व नव्या पदाधिकाऱ्यांचे हात बळकट करणे आपले कर्तव्य आहे. शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते हे जुने कार्यकर्ते असून पूर्वीपासून संघ कार्यात सक्रिय आहेत. इतके दिवस ते बॅकस्टेजला असायचे त्यामुळे प्रसिद्धी व चर्चेत आले नाहीत. मात्र ते अनुभवी असून त्यांच्या नेतृत्वाखाली महानगरपालिकेवर भाजपचा झेंडा नक्कीच फडकणार, असा विश्वास व्यक्त केला.

यावेळी गोकुळ काळे, राहुल जामगावकर, संतोष गांधी, अनिल निकम, ज्ञानेश्वर काळे आदींनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन डॉ. दर्शन करमरकर यांनी केले. यावेळी महेश नामदे, प्रिया जानवे, वंदना पंडित, आरती होशिंग, नीता फाटक, रेणुका कार्नदीकर, मिता देवराईकर, सुरेखा जंगम, कालिंदी केसकर, लीला अगरवाल, राखी आहेर, सोनाली चितळे, ज्योती दांडगे, सविता कोटा, श्वेता झोंड, बाळासाहेब भुजबळ, सुनील तावरे, दीपक देहेरेकर, प्रमोद बुऱ्हाडे, ज्ञानेश्वर धिरडे, अजित कोतकर, शुभम लोंढे, संध्या पावसे, विद्या कुलकर्णी, अर्चना बनकर, रेखा मैड, अमोल निस्ताने, लक्ष्मिकांत तिवारी, मंगेश खंगले आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## जवाहर नवोदय विद्यालयात प्रवेशासाठी आवाहन

नगर – केंद्र शासनामार्फत चालविण्यात येणाऱ्या व सीबीएसई अभ्यासक्रम असलेल्या पीएम श्री स्कूल जवाहर नवोदय विद्यालय, टाकळी ढोकेश्वर येथे शैक्षणिक वर्ष २०२६–२०२७ साठी प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. इयत्ता ६ वीमध्ये प्रवेशासाठी २९ जुलै पर्यंत ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन विद्यालयाच्या मुख्याध्यापकांनी केले आहे.

प्रवेश प्रक्रिया संपूर्णपणे ऑनलाईन पद्धतीने होणार असून www.navodaya.gov.in या संकेतस्थळावर अर्ज भरता येणार आहे. यासाठी विद्यार्थी व पालक अहिल्यानगर जिल्ह्यातील असावेत. विद्यार्थ्याने इयत्ता ३ री ते ५ वी पर्यंत सलग शिक्षण घेतलेले असावे. जात प्रमाणपत्र विहित नमुन्यातील असावे. अर्जासोबत विद्यार्थ्याचे आधारकार्ड किंवा रहिवासी प्रमाणपत्र तसेच दोन छायाचित्रे आवश्यक आहेत. प्रवेशासाठीची परीक्षा १३ डिसेंबर रोजी घेण्यात येणार आहे.

अधिक माहितीसाठी ९९६८२७०६८०, ९८८१४ ९८५९८ अथवा ८७८८९९६३७२ या क्रमांकावर संपर्क साधावा.

## डॉक्टर्स डे निमित्त सर्वरोग निदान शिबिराचे आयोजन

नगर – अहमदनगर होमिओपॅथीक शिक्षण संस्थेचे अहमदनगर होमिओपॅथीक मेडिकल कॉलेज व हॉस्पिटल सावेडी रोड, अहमदनगर येथे डॉक्टर्स डे निमित्त ३० जून ते ६ जुलै विविध आजारांवर मोफत सर्वरोग तपासणी व होमिओपॅथीक उपचार शिबीराचे आयोजन केले असल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य व रुग्णालयीन अधिक्षक डॉ. सुनिल पवार यांनी दिली आहे.

सदर शिबीरामध्ये त्वचा विकार– इसब नायटा, पिंपल्स, सोरायसिस, चाई लागणे, खरुज, पांढरे डाग, मस, चामखीळ, कुरुप, केसांच्या समस्या केस गळणे, केसात कोंडा होणे, केस दुभंगणे, मुळव्याध, भगंदर, फिशर, पित्त, पित्ताशयाचे खडे, मुतखडा, प्रोस्टेड ग्रंथीची वाढ, बदधकोष्ठता, अल्सरेटिव्ह कोलायटीस, मधुमेह, स्त्रियांच्या मासिक पाळीचे विविध विकार, मेनोपॉज, अंगावरुन पांढरे जाणे, वंध्यत्व, लठ्ठपणा, पी सी ओ डी, गाऊट, मणक्यांचे विकार, संधीवात, दमा, ॲलर्जी, नेहमी होणारी सर्दी, कान फुटणे, टॉन्सीलायटीस, मनोविकार या सारख्या विविध आजारांवर तज्ञ होमिओपॅथीक डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली रुग्णांची तपासणी करुन होमिओपॅथीक उपचार करण्यात येणार आहे.

रुग्णांनी लाभ घेण्याचे आवाहन अध्यक्ष डॉ. भुषण अनभुले, उपाध्यक्ष भुषण चंगेडे, खजिनदार डॉ. विलास बी सोनवणे, सचिव डॉ. डी. एस. पवार, सहसचिव लक्ष्मीनिवास सारडा, संचालक बोरा आर. एस., अभय मुथ्था, शिवाजी रणसिंग, डॉ. समीर होळकर, राजेंद्र मेहेत्रे, डॉ. ऋतुजा चव्हाण, कृष्णा क्षत्रिय तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुनिल पवार व आर एम ओ. डॉ. स्नेहल सोनलनकर यांनी दिली आहे.

## महानगरपालिका कर्मचारी युनियनच्या अध्यक्षपदी जितेंद्र सारसर व बाबासाहेब मुदगल तर सचिवपदी आनंद वायकर यांची बिनविरोध निवड



नगर – महानगरपालिका कर्मचारी युनियनची वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीच्या वातावरणात झाली. यावेळी सर्व विषयांना एकमताने मंजुरी दिली, सभासद दत्तात्रेय फटांगरे यांन युनियनच्या अध्यक्षपदी जितेंद्र सारसर व बाबासाहेब मुदगल यांच्या नावाची सूचना मांडली. तर सभासद अनिल लोंढे यांनी आनंद वायकर यांची सचिव पदाच्या नावाची सूचना मांडली, व सभासदांनी एकमताने मंजुरी दिली. यावेळी जल अभियंता परिमल निकम, अस्थापाना विभाग प्रमुख मेहर लहारे आदी सह सभासद उपस्थित होते.

सर्वसाधारण सभा आमदार संग्राम जगताप व मनपा आयुक्त यशवंत डांगे यांच्या प्रमुख उपस्थितीत व जितेंद्र सारसर यांच्या अध्यक्षतेखाली झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नंदकुमार नेमाने यांनी केले. बाबासाहेब मुदगल यांनी आभार मानले.

## अमृता झिंजे व कनिका गुप्ता हिचे येलो बेल्ट परीक्षेत उज्वल यश





नगर – नुकत्याच यंग मेन्स ज्युडो ॲण्ड मार्शल आर्ट्स असोसिएशनच्या सिद्धिबाग ज्युडो हॉल मध्ये आयोजित करण्यात आलेल्या येलो बेल्ट परीक्षेत १४ खेळाडूंनी यश मिळवले. ज्युडो फेडरेशन ऑफ इंडियाच्या वतीने या बेल्ट बाबत अभ्यासक्रमाची निर्मिती केलेली आहे. लेखी तोंडी व प्रात्यक्षिक अश्या पद्धतीने परीक्षा घेतली गेली. त्यामध्ये कु. अमृता झिंजे हिने ९६% मार्क मिळवत प्रथम क्रमांक मिळवला तर ९०% मार्क मिळवत कनीका गुप्ता हिने द्वितीय क्रमांक मिळवला.

ऋचा बोगा, लाभेश वारनौक, पार्थ दातरंगे, सिद्धी दातरंगे, गार्गी मुळे, स्वरूप जाधव, ओम पोकळे यांनी उच्च श्रेणी मध्ये तर सम्राट करंजुले, विराट करंजुले, अनुज बोगा यांनी प्रथम श्रेणी मध्ये परीक्षा उत्तीर्ण केली. सर्वांना संस्थेचे मार्गदर्शक प्रा. संजय धोपावकर, परीक्षक अजय कुलकर्णी, सय्यद फिरोज मुनीर, अदित्य धोपावकर यांचे मार्गदर्शन लाभले.


## गंगाधरशास्त्री गुणे आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय, विश्रामबाग, अहिल्यानगर.

### निवीदा सुचना

सन २०२५–२६ या सालाकरिता खालील तपशिलाप्रमाणे सिलबंद टेंडर्स मागविण्यात येत आहेत.

दि. ०५/०७/२०२५ पर्यत सुट्टीचे दिवस सोडुन कार्यालयीन वेळ सकाळी १०:०० ते ५:०० वाजेपर्यंत टेंडर फॉर्म फी भरुन विकत घेता येतील. दर भरुन सिलबंद टेंडर दि. २१/०७/२०२५ रोजी सायंकाळी ५:०० वाजेपर्यंत आमचे कार्यालयात पोहोचणे आवश्यक आहे. अन्य सर्व माहिती / अटी टेंडर फॉर्म सोबत मिळतील. टेंडर उघडण्याचा दि. २३/०७/२०२५ राहिल. कोणतेही कारण न देता टेंडर मंजुर करणे अगर नाकारण्याचे अधिकार संस्थेने राखुन ठेवलेले आहेत.

| अ. क्र. | टेंडर प्रकार | फॉर्म फी | बयाणा | डिपॉझिट |
|---|---|---|---|---|
| १ | आयुर्वेद औषधी टेंडर | रु. १५०/– | रु. १५०/– | रु. १५००/– |
| २ | इतर औषधी लॅब केमि. टेंडर | रु.५०/– | रु.५०/– | रु. १०००/– |
| ३ | इतर वस्तू टेंडर | रु.५०/– | रु.५०/– | रु. ५००/– |
| ४ | स्टेशनरी साहित्य टेंडर | रु. ५०/– | रु. ५०/– | रु. ५००/– |
| ५ | छपाई टेंडर | रु. ५०/– | रु. ५०/– | रु. ५००/– |
| ६ | धुलाई टेंडर | रु. ५०/– | रु. ५०/– | रु.५००/– |
| ७ | फर्निचर | रु. १५०/– | रु. १५०/– | रु. १५००/– |

**मानद कार्यवाहक**
आयुर्वेद शास्त्र सेवा मंडळ,
अहिल्यानगर.

**प्राचार्य/अधिक्षक**
गं. शा. गुणे आयुर्वेद महाविद्यालय/रुग्णालय,
अहिल्यानगर.

सदर जाहीरात गं.शा.गुणे आयुर्वेद महाविद्यालयाचे www.guneayurvedahmednagar.org या संकेत स्थळावर पाहता येईल.



## अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर

### जाहीर आवाहन

मा.राज्य शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत रमाई आवास योजना राबविण्यात येत आहे. सदर योजने अंतर्गत नागरीकांना त्यांच्या मालकीच्या खुल्या जागेवर ३० चौ.मी. क्षेत्रफळ बांधकामासाठी २.५० लक्ष अनुदान देण्यात येते. सदर योजने अंतर्गत अहिल्यानगर महानगरपालिका क्षेत्रातील अनुसुचित जाती व नवबौध्द घटकातील दारिद्र्य रेषेखालील व दारिद्र्य रेषेवरील इच्छुक नागरीकांना अहिल्यानगर महानगरपालिकेमार्फत कळविण्यात येते की खालील निकषामध्ये पात्र होणाऱ्या नागरीकांनी सदर योजनेचा लाभ घेण्यात यावा.

१) लाभार्थी अनुसुचित जाती व नवबौध्द घटकांमधील असावा. त्यासाठी त्याने जातीचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
२) लाभार्थींचे वार्षिक उत्पन्न कमाल मर्यादा ३ लाख
३) लाभार्थ्याची स्वतःची जागा असावी किंवा स्वतःचे कच्चे घर असावे.
४) महानगरपालिका क्षेत्रात त्यांचे १५ वर्षे वास्तव्य असावे.

लाभार्थ्याने उपरोक्त योजनेचा लाभ घेणे कामी विहीत नमुन्यातील अर्ज नविन प्रशासकीय इमारत, नगर–छत्रपती संभाजीनगर रोड, मनपा प्रकल्प विभाग येथे उपलब्ध असून अर्जा सोबत खालील कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे.

१) अर्जदाराचा स्वतःचा प्राधिकृत अधिकाऱ्यानी दिलेला जातीचा दाखला (साक्षांकित प्रत )
२) तहसिलदार यांचेकडील उत्पन्नाचा दाखला (साक्षांकित प्रत)
३) जागेचा उतारा (साक्षांकित प्रत)
४) घरपट्टी / विद्युत बिलाची (छायांकित प्रत )
५) रेशन कार्डाची (छायांकित प्रत)
६) निवडणूक ओळखपत्राची (छायांकित प्रत)
७) आधारकार्डची (छायांकित प्रत)
८) सध्याच्या कच्या घराचा / खुल्या जागेचा फोटो
९) मनपाची बांधकाम परवानगी.
१०) जातीय दंगल / ॲट्रॉसिटी पिडीत / पुरग्रस्त / विधवा / शासकीय अभिकरणामधून निवड झालेली व्यक्ती यापैकी असल्यास पुरावा जोडावा.

प्रसिद्धी विभाग जा.क्र. १४९
दि. २७/०६/२०२५

**उपायुक्त**
अहिल्यानगर महानगरपालिका



# AHMEDNAGAR MERCHANT'S CO-OP. BANK LTD., AHMEDNAGAR

मर्चन्टस बँक जेथे.. लक्ष्मी वास करी तेथे..

**Annexure I Form A**

**Balance Sheet as on 31st March, 2025** — Amount in Rs. lakh

| Particular | Schedule | As on 31-3-2025 (Current year) | As on 31-3-2024 (Previous year) |
|---|---|---|---|
| **Capital and Liabilities** | | | |
| Capital | 1 | 1,921.96 | 1,847.10 |
| Reserves and Surplus | 2 | 27,883.55 | 21,853.77 |
| Deposits | 3 | 1,46,215.72 | 1,38,019.21 |
| Borrowings | 4 | - | - |
| Other Liabilities and provisions | 5 | 3,339.10 | 2,994.64 |
| **Total** | | **1,79,360.34** | **1,64,714.72** |
| **Assets** | | | |
| Cash and Balance with Reserve Bank of India | 6 | 15,909.05 | 8,970.86 |
| Balance with banks and money at call and short notice | 7 | 27,097.48 | 25,596.31 |
| Investments | 8 | 32,737.13 | 31,791.94 |
| Advances | 9 | 96,838.91 | 95,077.37 |
| Propery, plant and equipment | 10 | 4,400.59 | 1082.82 |
| Intangible assets | 11 | - | - |
| Other assets | 12 | 2,377.17 | 2,195.42 |
| **Total** | | 179,360.34 | 164,714.72 |
| Contingent liabilities | 13 | 1,278.11 | 1,327.41 |
| Bills for collection | | 0.20 | 0.20 |

**Form B**

**Form of Profit and Loss Account for the Year ended on 31st March. 2025** — Amount in Rs. lakh

| Particular | Schedule | Year ended on 31-3-2025 (Current year) | Year ended on 31-3-2024 (Previous year) |
|---|---|---|---|
| Interest and discount earned | 14 | 16,437.00 | 14,693.35 |
| I nterest expenses | 15 | 7,741.92 | 6,862.04 |
| Net Interest Income | | 8,695.08 | 7,831.31 |
| Fee and commission income | | 411.71 | 317.17 |
| Fee and commission expense | | 214.75 | 208.94 |
| Net fee and commission income | | 196.96 | 108.23 |
| Other income from investments | 16 | 285.86 | 191.89 |
| Other income | 17 | 147.48 | 38.36 |
| Total income | | 9,325.38 | 8,169.80 |
| Employee benefits | 18 | 1,415.54 | 1,362.26 |
| Provision for non-performing assets | 19 | 2,312.99 | 1,655.17 |
| Depreciation on property, plant and equipment and amortization of intangible assets | | 139.99 | 133.64 |
| Other expenses | 20 | 3,865.25 | 3,685.19 |
| Total expenses | | 7,733.77 | 6,836.26 |
| Net profit/loss before taxes | | 1,591.61 | 1,333.54 |
| Tax expense: | | - | - |
| Current tax | | 888.75 | 730.20 |
| Deferred tax | | - | - |
| Net Profit (+)/ Loss (-) for the period | | 702.86 | 603.34 |
| Appropriations | | - | - |
| i. Transfer to Statutory Reserves | | - | - |
| ii. Proposed dividend | | - | - |
| iii. Other appropriations (to be specified) | | - | - |
| iv. Balance carried over to balance sheet | | | |

**For Ahmednagar Merchant's Co-op. Bank Ltd., Ahmednagar**

**FOR P A R A M & ASSOCIATES**
**(M/s. R R GUJARATHI & CO.)**
**Chartered Accountant's**
**FRN Reg.No. : 103382W**

**Nitin Bhandari** Jt. C.E.O. | **Sunil Puranik** C.E.O. | **Amit Mutha** Vice Chairman | **Hastimal Munot** Chairman

**CA ROHIT BAFNA**
**Partner -**
**M. No. 113955**
**(STATUTORY AUDITOR)**
**UDIN : 25113955BMJRBJ9569**

**-------- Board of Director--------**

Anil Pokharna | Kamlesh Bhandari | Anandram Munot
Sanjay Bora | Kishor Gandhi | CA IP Ajay Mutha
CA Mohan Barmecha | Sanjay Chopda | Kishor Munot
Sanjeev Gandhi | Subhash Bayad | Smt. Pramila Bora
Smt. Meena Munot | Vijay Kothimbire | Subhash Bhand
Jitendra Bora -------------Staff Director --------------- Prasad Gandhi

**P A R A M & ASSOCIATES**
**(M/s. R R GUJARATHI & CO.)**
**Chartered Accountants**

33, JITO Business Bay, Near Mumbai Naka, Nashik - 422002
Tel Phone - 0253-2572218/4065317 Email :- rrgujarathi@yahoo.com

**INDEPENDENT AUDITOR'S REPORT**

**Report on the Financial Statements-** 1. We have audited the accompanying financial statements of Ahmednagar Merchants Co-op Bank Ltd, Ahmednagar, which comprise the Balance Sheet as at **31st March 2025** and the Profit and Loss Account, and the Cash Flow Statement for the year then ended, and a summary of significant accounting policies and other explanatory information. The returns of 18 branches audited by us are incorporated in these financial statements. **Management's Responsibility for the Financial Statements-** 2. Management is responsible for the preparation of these financial statements that give a true and fair view of the financial position, financial performance and cash flow of the Bank in accordance with the Maharashtra Co-operative societies Act, 1960, Banking Regulation Act, 1949 (A.A.C.S.), and guidelines issued by the RBI / NABARD, the Registrar of Co-Operative Societies, Maharashtra, the Maharashtra Co-operative Societies Rules, 1961 (as applicable) and generally accepted accounting principles in India so far as applicable to the Bank. This responsibility includes the design, implementation and maintenance of internal control relevant to the preparation of the financial statements that are free from material misstatement, whether due to fraud or error. **Auditor's Responsibility-** 3. Our responsibility is to express an opinion on these financial statements based on our audit. We conducted our audit in accordance with the applicable Standards by The Institute of Chartered Accountants of India and under the MCS Act / BR Act / RBI guidelines. Those Standards require that we comply with ethical requirements and plan and perform the audit to obtain reasonable assurance about whether the financial statements are free from material misstatement. 4. An audit involves performing procedures to obtain audit evidence about the amounts and disclosures in the financial statements. The procedures selected depend on the auditor's judgment, including the assessment of the risks of material misstatement of the financial statements, whether due to fraud or error. In making those risk assessments, the auditor considers internal control relevant to the Bank's preparation and fair presentation of the financial statements in order to design audit procedures that are appropriate in the circumstances, but not for the purpose of expressing an opinion on effectiveness of the Bank's internal control. An audit also includes evaluating the appropriateness of accounting policies used and the reasonableness of the accounting estimates made by management, as well as evaluating the overall presentation of the financial statements. 5. We believe that the audit evidence we have obtained is sufficient and appropriate to provide a basis for our audit opinion. **Opinion-** 6. In our opinion and to the best of our information and according to the explanations given to us, the aforesaid financial statements together with the notes thereon give the information required by the Banking Regulation Act, 1949 (A.A.C.S.) as well as the Maharashtra Co-operative Societies Act, 1960, the Maharashtra Co-operative Societies Rules 1961, and guidelines issued by NABARD and guidelines issued by RBI and Registrar of Co-operative societies, Maharashtra in the manner so required for the bank and give a true and fair view in conformity with the accounting principles generally accepted in India:

a) in the case of the Balance Sheet, of the state of affairs of the Bank as at **31st March,2025**;
b) in the case of Profit and Loss Account, of the Profits for the year ended on that date; and
c) in the case of Cash Flow Statement, of the cash flows for the year ended on that date.

**Report on Other Legal and Regulatory Requirements-** 7. The Balance Sheet and the Profit and Loss Account and the Cash Flow Statement have been drawn up in accordance with the provisions of Section 29 of the Banking Regulation Act, 1949 read with provisions of the Maharashtra Co-operative Societies Act, 1960 & Maharashtra Co-operative Societies Rules 1961. 8. **We report that**:- a) We have obtained all the information and explanations which, to the best of our knowledge and belief, were necessary for the purpose of our audit and have found them to be satisfactory.

b) In our opinion, proper books of account as required by law have been kept by the Bank so far as it appears from our examination of those books and proper returns adequate for the purpose of our audit have been received from the branches / offices;
c) The transactions of the Bank, which have come to our notice, are within the powers of the Bank.
d) The Balance Sheet and the Profit & Loss Account dealt with by this report, are in agreement with the books of account and the returns;
e) The accounting standards adopted by the bank are consistent with those laid down by accounting principle generally accepted in India so far as applicable to the Bank.

9. As per the information and explanation given to us and based on our examination of the books of account and other records, we have not come across material instances in respect of the details mentioned in the Rule 69(6) of Maharashtra Co-operative Societies Rule 1961.

10. We further report that for the year under audit, the bank has been awarded **"A"** classification.

**PLACE :- NASHIK**
**DATE :- 21/06/2025**

**FOR P A R A M & ASSOCIATES**
**Chartered Accountants**
**FRN. 1103382W**
**CA. ROHIT BAFNA**
**Partner**
**M. No. 113955**
**(STATUTORY AUDITOR)**
**UDIN : 25113955BMJRBJ9569**

**P A R A M & ASSOCIATES**
**(M/s. R R GUJARATHI & CO.)**
**Chartered Accountants**

33, JITO Business Bay, Near Mumbai Naka, Nashik - 422002
Tel Phone - 0253-2572218/4065317 Email :- rrgujarathi@yahoo.com

**AUDIT CLASSIFICATION LETTER**

As per the norms of Audit Classification of Primary Urban Co-operative Bank and as per the Guidelines of Commissioner for Co-operation & Registrar of Co-operative Societies, Maharashtra State, Pune - 411 001, We are pleased to award **"A"** Class to **"Ahmednagar Merchant's Co-Op. Bank Ltd."**, Plot No. 33, Market Yard, Station Road, Ahmednagar-414001 for the year 2024-25

**PLACE :- NASHIK**
**DATE :- 21/06/2025**

**FOR P A R A M & ASSOCIATES**
**Chartered Accountants**
**FRN. 1103382W**

**CA. ROHIT BAFNA**
**Partner**
**M. No. 113955**
**(STATUTORY AUDITOR)**
**UDIN : 25113955BMJRBJ9569**




# करून घ्या प्रतिबंधात्मक चाचण्या

आरोग्यवेध



उपचारांपेक्षा प्रतिबंध योग्य ठरतो. आरोग्याच्या बाबतीत कोणतीही तडजोड करता कामा नये. वय वाढू लागल्यावर शरीरात बदल घडू लागतात. अनेक आजारांची सुरूवात होते. या आजारांचं निदान वेळीच झालं तर रोगमुक्त होता येतं. आजाराचं वेळीच निदान होण्यासाठी प्रतिबंधात्मक आरोग्य तपासणी करून घेणं गरजेचं आहे. तिशीनंतर उच्च रक्तदाब, मधुमेह, कोलेस्टरॉल यासह इतरही चाचण्या करून घ्यायला हव्यात. अशाच काही उपयुक्त आणि गरजेच्या आरोग्य चाचण्यांविषयी...

* हृदयविकार कोणत्याही वयात होऊ शकतो. सध्याचं धकाधकीचं जीवन, आहाराच्या चुकीच्या सवयी हृदयविकाराला निमंत्रण देतात. हृदयविकाराची काही लक्षणं दिसू लागतात. हा धोका वेळीच ओळखण्यासाठी ईसीजी तपासणी करून घ्यायला हवी. ईसीजी म्हणजे इलेक्ट्रोकार्डिग'ाम. या चाचणीमुळे भविष्यातला हृदयविकाराचा धोका ओळखता येतो. काही उपाययोजना किंवा जीवनशैलीत बदल करून हृदयविकाराला आळा घालता येतो.

* भविष्यातल्या व्याधींचा धोका वेळीच ओळखण्यासाठी जनुकीय चाचण्या करून घेता येतील. जनुकीय चाचण्यांमुळे डीएनएमधले बदल टिपता येतील. कॅन्सरचा धोका ओळखता येईल. बाळाचा विचार करत असाल तर जनुकीय चाचण्या दिशादर्शक ठरू शकतात. या चाचण्यांमुळे तुमच्या बाळाचं आरोग्यही उत्तम राहू शकतं. काही जनुकीय चाचण्या खूप उपयुक्त ठरू शकतात.

* लिपिड प्रोफाइल चाचणीमुळे कोलेस्टरॉलची पातळी कळते. चांगल्या आणि वाईट कोलेस्टरॉलची पातळी कळल्यानंतर हृदयाच्या आरोग्याची कल्पना येऊ शकते. तिशीनंतर साधारण दोन वर्षांनी संपूर्ण लिपिड प्रोफाइल चाचणी करून घ्यायला हवी. हृदयविकार, स्थूलपणा, मधुमेह यांचा कौटुंबिक इतिहास असेल तर नियमित लिपिड प्रोफाइल चाचणी खूप उपयुक्त आणि प्रतिबंधात्मक ठरू शकते. वाईट कोलेस्टरॉलची पातळी कमी करण्यासाठी प्रयत्न करायला हवेत.

* यकृताच्या चाचण्याही करून बघायला हव्यात. यकृताचं आरोग्य खूप महत्त्वाचं असतं. शरीरातली रसायनं, प्रथिनं आणि ट्रायग्लिसराइड्सची तपासणी करून यकृताच्या आरोग्याची माहिती घेतली जाते. यामुळे हेपिटायटिससार'या विकारांचा धोका कमी होऊ शकतो किंवा वेळीच उपचार होऊ शकतात. तिशीनंतर यकृताची नियमित चाचणी करायला हवी.

* पॅप स्मिअर तसंच कोलनोस्कोपी या चाचण्याही गरजेच्या आहेत. पॅप स्मिअर ही चाचणी महिलांसाठी अत्यंत गरजेची आहे. तिशीनंतर या चाचण्या नियमितपणे करणं गरजेचं आहे. या चाचण्यांमुळे सर्व्हिकल कॅन्सर तसंच इतर घातक आजारांचा धोका वेळीच लक्षात येतो आणि त्या दृष्टीने उपाय करता येतात. कोलनोस्कोपी ही चाचणी पुरुषांसाठी गरजेची आहे. या चाचण्या पन्नाशीनंतर केल्या तरी चालत असलं तरी तिशीनंतर केल्यास घातक व्याधींचा धोका वेळीच लक्षात येऊ शकतो. कुटुंबात कलोन कॅन्सरचा इतिहास असेल तर ही चाचणी करून घेणं खूप गरजेचं आहे.

# गर्भवती महिलांचा मृत्यूदर चिंताजनक!



आराग्य वेध

डॉ. मेघा दळे

जागतिक आरोग्य संघटनेच्या मते जगात दर दोन मिनिटांनी एका गर्भवती महिलेचा मृत्यू होतो. माता मृत्युदर म्हणजे गर्भधारणेदरम्यान, प्रसूतीच्या वेळी किंवा प्रसूतीनंतर ४२ दिवसांच्या आत होणारा महिलेचा मृत्यू. 'अमेरिकन कॉलेज ऑफ ऑब्स्टेट्रिशियन अँड गायनॅकॉलॉजिस्ट' ही संस्था अनेक प्रकरणांमध्ये गर्भधारणेनंतर एक वर्षापर्यंतच्या कालावधीत होणाऱ्या मृत्यूला माता मृत्यूच मानते. माता मृत्युदर (एमएमआर) म्हणजे प्रति एक लाख जन्मांमागे झालेला मातांचा मृत्यू. २०२३ मध्ये जागतिक एमएमआर प्रति एक लाख जिवंत जन्मांमागे १९७ होता. कमी उत्पन्न असलेल्या देशांमध्ये हा दर ३४६ आणि उच्च उत्पन्न असलेल्या देशांमध्ये तो १० होता.

**महिलांच्या मृत्यूची कारणे**

* **रक्तस्त्राव:** प्रसूतीनंतर जास्त रक्तस्त्राव (पोस्टपार्टम हेमरेज) हे माता मृत्यूचे सर्वात मोठे कारण आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या मते १९९० मध्ये एक लाख १४ हजार महिला अतिरिक्त रक्तस्त्रावामुळे मृत्युमुखी पडल्या. हा आकडा २०२१ पर्यंत ४७ हजारापर्यंत कमी झाला.

* **उच्च रक्तदाब विकार:** प्रीक्लेम्पसिया आणि एक्लेम्पसिया सारखे उच्च रक्तदाब विकार गर्भवती महिलांमध्ये मृत्यूचे प्रमुख कारण आहेत. हे विकार मेंदू, मूत्रपिंड आणि इतर अवयवांना नुकसान पोहोचवू शकतात.

* **मानसिक आरोग्य स्थिती:** नैराश्य, चिंता आणि प्रसूतीनंतरचे नैराश्य यासारख्या मानसिक आरोग्य स्थिती माता मृत्यूची प्रमुख कारणे आहेत.

* **संसर्ग:** गर्भधारणेदरम्यान किंवा प्रसूतीनंतर सेप्सिससारखे संसर्ग हे माता मृत्यूचे आणखी एक प्रमुख कारण आहे.

* **हृदयरोग:** हृदयरोग आणि कार्डिओमायोपॅथी (हृदयाच्या स्नायूंचे कमकुवत होणे) ही माता मृत्यूची प्रमुख कारणे आहेत.

# 'क' जीवनसत्त्वाच्या अतिसेवनामुळे...




काय खावं?

एखाद्या पोषक घटकाच्या कमतरतेबरोबरच शरीराला आवश्यक असणाऱ्या जीवनसत्त्वांचा, खनिजांचा अतिरेकही वाईटच. सर्वसाधारणपणे निरोगी प्रौढ व्यक्तीला दररोज ६५ ते ९० मिलिग्रॅम 'क' जीवनसत्त्वाची गरज असते. मात्र त्याचा अतिरेक घातक ठरू शकतो.

* 'क' जीवनसत्त्वयुक्त पूरक औषधांच्या अतिरेकामुळे पचनसंस्थेशी संबंधित तक्रारी निर्माण होतात. दिवसभरात २००० मिलिग्रॅमपेक्षा अधिक क्षमतेची 'क' जीवनसत्त्वयुक्त पूरक औषधं घेतल्यास जुलाब, मळमळणं, अ‍ॅकसिड रिफ्लक्ससार'या समस्या उद्भवू शकतात.

* 'क' जीवनसत्त्व शरीराला लोह शोषून घ्यायला मदत करतं. या जीवनसत्त्वाच्या अतिसेवनामुळे शरीर लोहही अधिक प्रमाणात शोषून घेईल. लोहाच्या अतिप्रमाणामुळे यकृत, हृदय, थायरॉइड, स्वादुपिंड तसंच मज्जासंस्था यांना नुकसान पोहचू शकतं.

* 'क' जीवनसत्त्वाच्या अतिसेवनामुळे मूतखड्याचा धोका वाढतो. हे जीवनसत्त्व ऑक्सालेटच्या रुपात मूत्रावाटे शरीराबाहेर टाकलं जातं. 'क' जीवनसत्त्व अधिक प्रमाणात घेतल्यास मूत्रातल्या ऑक्सालेट या घटकाचं प्रमाण वाढून खडे किंवा स्फटिक तयार होण्याची शक्यता वाढते.

# बॅड कोलेस्टेरॉलकडे दुर्लक्ष नको



आरोग्य चर्चा

डॉ. अजिंक्य बोऱ्हाडे

शरीरातील कोलेस्टेरॉलचे वाढलेले प्रमाण 'सायलेंट किलर' ठरते. त्याची लक्षणे चेहऱ्यापासून शरीरापर्यंत दिसतात. काही वेळा डोळ्यांभोवती किंवा आजूबाजूला पिवळे डाग दिसतात. हे झेंथेलास्माचे लक्षण असू शकते. हे डाग बहुतेकदा शरीरात कोलेस्टेरॉलचे प्रमाण वाढले असल्याचे निदर्शक मानले जातात. चेहर्याबचा रंग बदलणे, पापण्यांवर पिवळे डाग येणे ही त्याची आणखी काही लक्षणे आहेत. डोळ्यांच्या बुब्बुळांभोवती हलक्या रंगाची रिंग तयार होणे हे डोळ्यांमध्ये कोलेस्ट्रॉल जमा होऊ लागल्याचे लक्षण असू शकते.

रक्तात कोलेस्ट्रॉलचे प्रमाण वाढल्यास रक्तवाहिन्या ब्लॉक होण्याचा धोका वाढतो. त्यामुळे हृदयाला त्रास होऊ लागतो. शरीर थकलेले आणि सुस्त वाटते. कोलेस्टेरॉल वाढल्यामुळे त्वचेवर कोरडेपणासह खाज येण्याची समस्या दिसून येते. निळ्या आणि जांभळ्या रंगाचे डाग तयार होतात. ही रक्ताभिसरणावर अनिष्ट परिणाम झाल्याची लक्षणे आहेत. रक्तप्रवाह प्रभावित झाल्यामुळे डोके आणि पाय दुखण्याच्या तक्रारी दिसून येतात.

शरीरातील उच्च कोलेस्टेरॉलचा परिणाम पचनसंस्थेवर होतो. यासोबतच फुफ्फुसे आणि हृदयावरही दबाव वाढतो.

त्यामुळे छातीत दुखण्यासोबत श्वास घेण्यास त्रास होऊ शकतो. जंक फूडचे जास्त सेवन, शारीरिक हालचालींपासून दूर राहणे, जास्त वजन, लठ्ठपणा, दारू आणि सिगारेटचे सेवन तसेच अनुवांशिकता ही शरीरात कोलेस्टेरॉलची पातळी वाढण्यामागील करणे असू शकतात.

# डोळे मिचकावताय?



वेगळे काही

डॉ. कुंदन गायकवाड

डोळे मिचकावणे हे 'मायोकायमिया' या आजाराचे लक्षण असू शकते. पापणीचे स्नायू आकुंचन पावल्यामुळे डोळे मिचकावले जातात. 'नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ न्यूरोलॉजिकल डिसऑर्डर्स अँड स्ट्रोक' (एनआयएनडीएस)च्या मते बहुतेकवेळा ही स्थिती सौम्य असते आणि काही सेकंदांपासून काही मिनिटांपर्यंत टिकते.

* **तणाव आणि चिंता:** २०२३ मध्ये 'जर्नल ऑफ क्लिनिकल न्यूरोसायकोलॉजी'मध्ये प्रकाशित झालेल्या एका अभ्यासानुसार तणाव मेंदूच्या न्यूरोट्रांसमीटर संतुलनावर परिणाम करतो. त्यामुळे पापण्यांच्या स्नायूंचे अनैच्छिक आकुंचन होऊ शकते.

* **झोपेचा अभाव:** पुरेशी झोप न घेतल्याने डोळे मिचकतात. 'स्लीप रिसर्च सोसायटी'च्या २०२४ च्या अभ्यासानुसार ७-९ तासांपेक्षा कमी झोपणाऱ्या लोकांना 'मायोकायमिया' होण्याची शक्यता ४० टक्के जास्त असते.

* **कॅफिन आणि अल्कोहोलचे जास्त सेवन:** कॉफी, चहा किंवा एनर्जी ड्रिंक्समध्ये आढळणारे कॅफिन आणि अल्कोहोल मज्जासंस्थेला उत्तेजित करतात. त्यामुळे डोळ्यांचे स्नायू संवेदनशील होऊ शकतात. '२०२३ मध्ये फूड सायन्स अँड न्यूट्रिशन जर्नल'मध्ये प्रकाशित झालेल्या एका अभ्यासानुसार, कॅफिनचे जास्त सेवन केल्याने 'मायोकायमिया'चा धोका ३० टक्क्यांनी वाढू शकतो.

* **डोळ्यांचा दाब:** मोबाईल, लॅपटॉप किंवा टीव्हीच्या स्क्रीनकडे जास्त वेळ पाहिल्याने डोळ्यांच्या स्नायूंवर दबाव येतो. त्यामुळे डोळे मिचकवू शकतात. २०२४ मध्ये 'ऑप्थॅल्मोलॉजी रिसर्च'मध्ये प्रकाशित झालेल्या एका अभ्यासात डिजिटल स्क्रीनवर ६ तासांपेक्षा जास्त वेळ घालवणाऱ्यांमध्ये डोळे मिचकण्याच्या तक्रारी २५ टक्के जास्त असतात, असे आढळून आले आहे..

* **पोषक तत्वांची कमतरता:** व्हिटॅमिन बी१२, मॅग्नेशियम आणि पोटॅशियमची कमतरता मज्जासंस्थेवर परिणाम करते. त्यामुळे डोळे मिचकतात.

* **डोळे कोरडे आणि ऍलर्जी** : ५० वर्षांहून अधिक वयाच्या लोकांना डोळे कोरडे होण्याची समस्या असते. त्यामुळे त्यांचे डोळे मिचकतात.

* **गंभीर न्यूरोलॉजिकल समस्या:** काही वेळा डोळे मिचकावणे हे ब्लेफेरोस्पाझम किंवा हेमिफेशियल स्पॅझम सारख्या गंभीर न्यूरोलॉजिकल समस्यांचे संकेत असू शकते. ब्लेफरोस्पाझममध्ये दोन्ही डोळ्यांच्या पापण्या अनैच्छिकपणे बंद होऊ शकतात. हेमिफेशियल स्पॅझममध्ये चेहऱ्याच्या एका बाजूला परिणाम होतो. मल्टिपल स्क्लेरोसिस किंवा पार्किन्सन सारख्या आजारांमुळेदेखील डोळे मिचकू शकतात. अशा वेळी ताबडतोब न्यूरोलॉजिस्टशी संपर्क साधावा.

# बटाटे फ्रीजमध्ये ठेऊ नका!



कुठे चुकतो आपण?

आपण बटाटे खराब होऊ नयेत म्हणून फ्रीजमध्ये ठेवले जातात. मात्र ही कृती आरोग्याच्या दृष्टीने घातक ठरू शकते.

* बटाटा फ्रीजमध्ये ठेवल्यानंतर त्यातल्या स्टार्चचं रुपांतर साखरेत होतं. हीच साखर आरोग्याच्या दृष्टीने घातक ठरू शकते. फ्रीजमधले बटाटे खाल्ल्यामुळे कर्करोगासारखी दुर्धर व्याधीही जडू शकते.

* बटाट्यातल्या साखरेचा यातल्याच अमिनो ॲसिड ॲस्परॅगनशी संपर्क होऊन ॲरक'इलामाइड नावाचं घातक रसायन तयार होतं. हे रसायन आरोग्यासाठी खूपच घातक ठरतं.

* फ्रीजमध्ये ठेवलेले बटाटे शिजवल्यानंतर त्यात ॲक्रइलामाइड रसायनाची निर्मिती होऊ लागते. हे रसायन पोटात गेल्यानंतर बराच त्रास होऊ शकतो. त्यामुळे बटाटे कोरड्या जागी ठेवायला हवेत.

* ॲक्राइलामाइड हे रसायन स्टार्चयुक्त पदार्थांमध्ये आढळतं. उच्च तापमानावर शिजवलेल्या स्टार्चयुक्त पदार्थांमध्ये या रसायनाची निर्मिती होते. हे रसायन कॅन्सरला कारणीभूत ठरू शकतं.

# दोषांनुसार निवडा व्यायामप्रकार



आयुर्वेद आणि विकार

निरोगी आणि तंदुरुस्त रहाण्यासाठी व्यायाम गरजेचा आहे हे आपण जाणतो. शरीराला कोणत्याही प्रकारचा व्यायाम चालतो, असं आपल्याला वाटतं. पण शरीरातल्या दोषांनुसार व्यायामाची निवड करायला हवी असं आयुर्वेद सांगतं. याबाबत विस्ताराने जाणून घेऊ.

* वात दोष असणारे लोक मुळातच उत्साही असतात. मात्र या लोकांची देहयष्टी बारीक असते. त्यांची पचनशक्तीही कमकुवत असते. तसंच त्यांचं वजनही कमी असतं. त्यामुळे वात दोष असणाऱ्यांनी कमी वेग असणाऱ्या व्यायामप्रकारांची निवड करायला हवी. लंजेस, स्क्वॉट्स, रेझिस्टन्स बँड ट्रेनिंग हे व्यायामप्रकार वात दोषांसाठी योग्य ठरतात. योगासनं तसंच कमी तीव्रतेचे व्यायामप्रकारही चालून जातात.

* पित्त प्रवृत्तीच्या लोकांचं शरीर अधिक उष्ण असतं. त्यांची शारीरिक क्षमता उत्तम असते. तसंच बांधाही मध्यम असतो. या लोकांनी आरामदायी तसंच तुलनेने सोपे व्यायामप्रकार करणं गरजेचं आहे. पित्तामुळे उष्णता वाढत असल्यामुळे या लोकांनी उष्ण तसंच आर्द्र जागेत व्यायाम करू नये. यीन योगा, पिलेट्स, पोहणं, चालणं असे व्यायाम करता येतील.

* कफ प्रवृत्तीच्या लोकांची शारीरिक क्षमता उत्तम असते. पण आळशीपणामुळे त्यांचं वजनही लवकर वाढतं. या लोकांना व्यायामासाठी उद्युक्त करणं खूप कठीण असतं. या लोकांनी झुंबा, कार्डिओ तसंच इतर वेगवान व्यायामप्रकार करायला हवेत.

# लहान मुलांनाही यकृताचा धोका



आरोग्य विशेष

डॉ. अजेय गर्जे

लहान मुलांमध्ये यकृताचा आजार क्वचितच दिसून येतो. परंतु 'अमेरिकन लिव्हर फाउंडेशन'च्या मते, फॅटी लिव्हर डिसीज (नॉन-अल्कोहोलिक फॅटी लिव्हर), व्हायरल हेपेटायटीस (हिपॅटायटीस ए, बी, सी), ऑटोइम्यून हेपेटायटीस, मेटाबॉलिक लिव्हर डिसीज हे आजार यकृताचे आरोग्य बिघडवू शकतात.

जन्मापासून यकृतामध्ये दोष, आनुवंशिक समस्या, विषाणू संसर्ग (उदा. हिपॅटायटीस विषाणू), शरीरात एंझाइमची कमतरता, रोगप्रतिकारक शक्तीचे अयोग्य कार्य, जास्त चरबी किंवा साखर असलेले अन्न खाणे यामुळे ही समस्या वाढते.

मूल वारंवार आजारी पडत असेल, त्याचे वजन व्यवस्थित वाढत नसेल किंवा वारंवार उलट्या होत असतील तर हे यकृताच्या आजाराचे लक्षण असू शकते. याशिवाय, त्वचा किंवा डोळे पिवळे होणे (कावीळ), पोट फुगणे, लघवीचा गडद रंग, विष्ठेचा हलका रंग, थकवा आणि अशक्तपणा आणि भूक न लागणे ही त्याची लक्षणे असू शकतात. डॉक्टर मुलाच्या लक्षणांवर आधारित रक्त तपासणी, अल्ट्रासाऊंड किंवा सीटी स्कॅन, बायोप्सी, अनुवांशिक चाचणी अशा काही चाचण्या करतात.

उपचार रोगाच्या तीव्रतेवर आणि प्रकारावर अवलंबून असतात. काही प्रकरणांमध्ये औषधांमुळे विकार बरा होतो. परंतु गंभीर प्रकरणांमध्ये यकृत प्रत्यारोपणाची आवश्यकता भासू शकते. पित्त अट्रेसियासारख्या प्रकरणांमध्ये, वेळेवर शस्त्रक्रिया करणे आवश्यक ठरते.

# वायफाय, लॅपटॉपमुळे येते वंध्यत्व



जाणून घ्या

डॉ. सतीश सोनवणे

लोक अनेकदा लॅपटॉप मांडीवर ठेवून काम वापरतात. यामुळे ऑलिगोस्पर्मिया होऊ शकतो. यात वीर्यातील शुक्राणूंची संख्या कमी होते आणि त्याचा प्रजनन क्षमतेवर परिणाम होतो.

'नॅशनल लायब्ररी ऑफ मेडिसिन'मध्ये डिसेंबर २०१६ मध्ये प्रकाशित झालेल्या एका अभ्यासानुसार मांडीवर ठेवून लॅपटॉप वापरण्याचे अनेक तोटे होऊ शकतात. जागतिक आरोग्य संघटनेच्या मते संपूर्ण जगातील जवळजवळ प्रत्येक सहावी व्यक्ती वंध्यत्वाचा सामना करत आहे. भारतातही १५-२० टक्के जोडपी वंध्यत्वाचा सामना करत आहेत. यापैकी ४०-५० टक्के प्रकरणे पुरुषांच्या वंध्यत्वामुळे होतात. शुक्राणूंच्या निर्मितीसाठी, अंडकोषांचे तापमान शरीराच्या सामान्य तापमानापेक्षा सुमारे ३ अंश सेल्सिअसने कमी असले पाहिजे. लॅपटॉप मांडीवर ठेवून बराच काळ वापरला जातो तेव्हा त्याची उष्णता थेट अंडकोशाचे तापमान वाढवते. यामुळे शुक्राणूंच्या निर्मितीची प्रक्रिया मंदावते किंवा विस्कळीत होते. त्यामुळे प्रजनन क्षमतेवर परिणाम होऊ शकतो.

लॅपटॉप वायफायला कनेक्ट केल्यानंतर मांडीवर ठेवून वापरला तर नुकसान आणखी वाढू शकते. याचे कारण म्हणजे वायफायमधून निघणारे रेडिएशन शरीराच्या नाजूक भागांवर, विशेषतः अंडकोषांच्या कार्यावर परिणाम करते.

यामुळे शुक्राणूंच्या डीएनएला नुकसान होऊ शकते. त्यांची पुढे जात राहण्याची क्षमता कमी होऊ शकते आणि रचनादेखील खराब होऊ शकते. हे सतत केल्याने शुक्राणूंची संख्या कमी होऊ शकते आणि प्रजनन क्षमतेवर वाईट परिणाम होऊ शकतो.

नवसंशोधन

## विषाणू ओळखणारं उपकरण



विषाणूंच्या विविध प्रजाती शोधून ओळख पटवण्यासाठी एका नव्या उपकरणाचा शोध लावण्यात शास्त्रज्ञांना यश आलं आहे. हे उपकरण उपयुक्त आणि कमी खर्चिक आहे. 'व्हिरिऑन' असं त्याचं नाव आहे. हे उपकरण वैद्यकीय क्षेत्रातच नाही तर इतर क्षेत्रातही वापरता येऊ शकतं. या उपकरणाचा वापर करून शेतकरी शेतातले रोगजंतू शोधू शकतात. हे उपकरण काही क्षणांमध्ये विषाणूंची ओळख पटवत असल्यामुळे विकारांचं निदान लवकर होऊ शकतं. त्यामुळे उपचारांनाही लवकर सुरूवात होऊ शकते. प्रत्येक डॉक्टरकडे हे उपकरण असायला हवं. ग'ामीण भागात या उपकरणाचा अधिक चांगला वापर होऊ शकतो.

काळजी डोळ्यांची

## लहानग्यांनाही होतो मोतीबिंदू!



मोतीबिंदू फक्त प्रौढांना होतो, असं आपल्याला वाटतं. पण प्रत्यक्षात लहान मुलांना आणि त्यातही छोट्या बाळांना मोतीबिंदू होऊ शकतो. मोतीबिंदूमुळे अंधूक दिसू लागतं. काही वेळा दृष्टी अधू होते. मोतीबिंदूचा प्रादुर्भाव एका किंवा दोन्ही डोळ्यांना होऊ शकतो. त्यामुळे लहानग्यांच्या डोळ्यांची नियमित तपासणी करून घ्यायला हवी. मोतीबिंदू जन्मजात असू शकतो. मातेला काही आजार झाल्यास गर्भातल्या बाळाच्या डोळ्यांमध्ये दोष निर्माण होऊ शकतात. ही समस्या अनुवंशिकही असू शकते. बाळाच्या पालकांना लहानपणी मोतीबिंदू झाला असेल तर मुलांनाही हा त्रास होऊ शकतो.

जपणूक त्वचेची

## मध ठरतो उपयुक्त



थंडीत त्वचा कोरडी पडते. ओठ फुटतात. म्हणूनच या दिवसात कोल्ड क'ीम, बॉडी लोशन, लिप बामचा मोठ्या प्रमाणावर वापर होतो. मात्र निसर्गाने त्वचेच्या रक्षणासाठी बरीच आयुधं दिलं आहेत. त्यापैकी एक म्हणजे मध. खोबरेल तेल, मध, लॅनोलिन आणि ई जीवनसत्त्व यांचा वापर करून घरच्या घरी लिप बाम किंवा क'ीम तयार करता येईल. या क'ीममुळे त्वचा कोरडी पडणार नाही.

आजीबाईचा बटवा

## लाभ लवंगयुक्त पाण्याचे...



लवंगांमध्ये अनेक औषधी गुणधर्म आहेत. दंतविकारांमध्ये लवंग खूप लाभदायी ठरते. लवंगामुळे इतर काही विकारांनाही प्रतिबंध करता येतो. लवंगयुक्त पाणीही औषधी असतं. या पाण्याचं सेवन नियमितपणे करायला हवं. हिवाळ्यात लवंगेचं पाणी पिणं गरजेचं आहे. या पाण्यामुळे पचनसंस्थेचं कार्य सुधारतं. वजन कमी करणार्यांसाठीही हे पाणी उपयुक्त असतं. शरीराचा दाह कमी करण्याचा गुणधर्मही यात आहे. एका भांड्यात पाणी घेऊन दोन-तीन लवंगा भिजवून ठेवा. लवंगा रात्रभर भिजत ठेवा. सकाळी उठल्यावर हे पाणी प्या. या पाण्यामुळे वजन कमी होण्याच्या प्रकि'येचा वेग वाढतो.

# रोटरी क्लब ऑफ अहमदनगर सेंट्रलच्या अध्यक्षपदी सुनील कटारिया, सचिवपदी अमर गुरप यांची निवड





नगर – रोटरी क्लब ऑफ अहमदनगर सेंट्रलच्या २०२५–२६ यावर्षासाठी पदाधिकाऱ्यांची आणि कार्यकारिणी मंडळाची घोषणा करण्यात आली. यामध्ये रो. सुनील माणकचंद कटारिया यांची अध्यक्षपदी तर रो. अमर गुरप यांची सचिवपदी निवड करण्यात आली. रोटरी इंटरनॅशनलचे जिल्हा ३१३२ या जिल्ह्याचे डिस्ट्रिक्ट गव्हर्नर रो. सुधीर लातुरे व असिस्टंट गव्हर्नर रो. मधुरा झावरे यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील वर्षासाठी नवीन संचालक मंडळाची पुढील प्रमाणे निवड करण्यात आली आहे. खजिनदारपदी रो. धीरज मुनोत, उपाध्यक्षपदी रो. डॉ. दिलीप बागल, माजी अध्यक्ष व फेलोशिप संचालक रो. डॉ. कुणाल कोल्हे, क्लब लर्निंग फॅसिलिटेटर रो. मनीष बोरा, क्लब क्शन प्लॅन चॅम्पियन व पब्लिक इमेज रो. ईश्वर बोरा, टीआरएफ रो. हरीश नायर, मेम्बरशिप डेव्हलपमेंट रो. चेतन अमरापूरकर, क्लब ॲडमिन रो. प्रसन्न खाजगीवाले, कम्युनिटी सर्विसेस रो. उमेश रेखे, यूथ सर्व्हिसेस रो. हितेश गुप्ता, ह्यूमन डेव्हलपमेंट रो. राजीवभाई गुजर, व्होकेशनल सर्विस रो. विजय जुंद्रे, रोटरी इंटरनेशनल एम्फेसिस रो. दत्ता दीक्षित, डिस्ट्रिक्ट एम्फेसिस रो. गिरीश मुळे, बुलेटिन संपादक रो. सुजाता कटारिया, सर्जंट– ॲट–आर्म्स रो. सतीश कटारिया, वैद्यकीय सेवा डॉ. श्रेया खजगीवाले, पोलिओ प्लस डॉ. उज्वला शिरसाठ, आयटी रो. अतुल बोरा, मानव संसाधन रो. राजीव गुजर, पदनिर्वाचित अध्यक्षपदी रो. अमर गुरप, तसेच सल्लागारपदी रो. डॉ. श्रीकृष्ण जोशी व पीडीजी रो. शिरीष रायते यांना नियुक्ती पत्र देण्यात आले आहे.

रो. सुनील कटारिया म्हणाले, रोटरी क्लब ऑफ अहमदनगर सेंट्रलच्या आगामी वर्षात पर्यावरण संवर्धन, महिला सक्षमीकरण, पीस ॲण्ड फेलोशिप, स्वच्छता मोहिमा, ग्रामीण व शहरी भागातील शाळांमध्ये शुद्ध पाण्याची सुविधा, आरोग्य तपासणी शिबिरे, ग्रंथालयांची उभारणी, विद्यार्थ्यांसाठी कौशल्य विकास उपक्रम अशा विविध प्रकल्पांची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. रोटरी ही केवळ संस्था नसून ती एक सेवा संस्कृती आहे. संपूर्ण कार्यकारिणी सदस्यांच्या सहकार्याने समाजात दीर्घकालीन परिणाम करणारे उपक्रम हाती घेण्याचा आमचा दृढ संकल्प आहे. 'क्लबहित आणि देशहित' हेच आमच्या कार्याचे ब्रीदवाक्य राहील, असे त्यांनी सांगितले.

रो. अमर गुरप म्हणाले, सक्रिय सहभाग, योजनाबद्ध अंमलबजावणी आणि पारदर्शक कार्यपद्धती यांद्वारे आम्ही समाजोपयोगी कार्यात सातत्य ठेवणार आहोत. नव्या पिढीला जोडून, नव्या कल्पनांचा अवलंब करून क्लब अधिक प्रभावीपणे काम करेल, असा आमचा विश्वास आहे. याकरिता रोटरी क्लब ऑफ अहमदनगर सेंट्रलला आपण सहकार्य करावे व कोणत्याही समाजोपयोगी कार्यासाठी क्लबच्या ९८२२०१००८१, ९८२३७९९९९८ याक्रमांकावर संपर्क करावा, असे आवाहन त्यांनी केले.

# 'संघ गंगा के तीन भगीरथ' नाटकाचे २ जुलैला अहिल्यानगरमध्ये आयोजन



नगर – राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी निमित्त संघाच्या इतिहासाची व कार्याची ओळख करून देणाऱ्या 'संघ गंगा के तीन भगीरथ' या दोन अंकी हिंदी नाटकाचे आयोजन अहिल्यानगरमध्ये करण्यात आले आहे. २ जुलै रोजी सायंकाळी ८ वाजता सावेडीच्या माऊली सभागृहात निमंत्रितांसाठी या नाटकाचा प्रयोग होणार आहे, अशी माहिती विचार भारतीचे सुनील नागोरी यांनी दिली.

याबाबत डॉ.विक्रम दिडवानीया म्हणाले, १९२५ साली स्थापन झालेल्या रा.स्व.संघास यावर्षी १०० वर्ष पूर्ण झाली आहेत. यानिमित्ताने विविध उपक्रमांचे आयोजन केले जात आहे. या अंतर्गत या हिंदी नाटकाचे आयोजन सर्वांसाठी केले आहे. संघाचे प्रथम संघचालक डॉ.केशव हेडगेवार, द्वितीय संघचालक माधव गोळवलकर गुरुजी व तृतीय संघचालक बाळासाहेब देवरस यांच्या कार्यावर हे नाटक असून संघाचा १०० वर्षातील प्रवास यात आहे. नाटकाचे लेखक श्रीधर गाडगे असून संजय पेंडसे निर्देशक आहेत.

या नाटकाचे पूर्ण भारतभर प्रयोग होणार आहेत. अहिल्यानगरमधील विचार भारतीच्यावतीने या नाटकाच्या विशेष प्रयोगाचे आयोजन केले आहे. माहितीसाठी सुनील नागोरी ८३०८१७८५६४ व डॉ.विक्रम दिडवानीया ९८२२२१०३४५ यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन अंकुश गोळे यांनी केले आहे.

# संविधान विरोधी व अल्पसंख्यांक समाजविरोधात आक्षेपार्ह वक्तव्य करणारे आमदार संग्राम जगताप यांच्यावर कायदेशीर कारवाई करुन निलंबन करा

## समस्त मुस्लिम समाजाचा जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा, निदर्शने करुन सुरु असलेल्या कृत्याचा निषेध





संविधान विरोधी आणि अल्पसंख्यांक समाजविरोधात आक्षेपार्ह वक्तव्य करणारे आमदार संग्राम जगताप यांच्यावर कायदेशीर कारवाई करुन निलंबनाची करण्याच्या मागणीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढून जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देताना समस्त मुस्लिम समाज.

नगर – जिल्ह्यात नव्हे तर संपूर्ण राज्यात लोकप्रतिनिधी मुस्लिम, ख्रिश्चन अल्पसंख्यांक समाजाला उद्देशून अपशब्द व आक्षेपार्ह वक्तव्य करत आहे. या सर्व प्रकरणाचा शहरातील समस्त मुस्लिम समाजाच्या वतीने निषेध नोंदवून आक्षेपार्ह वक्तव्य करणाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. या मागणीचे निवेदन जिल्हाधिकारी पंकज आशिया यांना देण्यात आले. २७ जून रोजी दुपारी मुस्लिम युवकांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करुन संविधान विरोधी सुरु असलेल्या कृत्याचे निषेध नोंदवला.

समाजात जातीय द्वेष पसरविण्याच्या उद्देशाने मुस्लिम समाजाबद्दल कधी हिरवे साप, कधी बांग्लादेशी, पाकिस्तानी म्हणून उद्देशून बोलले जात आहे. कोणताही धार्मिक कार्यक्रम असो, त्यात जोपर्यंत मुस्लिम अल्पसंख्यांक समाजाला विरोधात काही आक्षेपार्ह बोलतात.

नुकतेच शनिशिंगणापूर येथे काम करणाऱ्या मुस्लिम अल्पसंख्यांक समाजाला कामावरून काढून टाकण्यासाठी आंदोलन केले व तेथे काम करणाऱ्या सर्व मुस्लिम समाजाला जिहादी असल्याचे संबोधले. तसेच सोलापूर अक्कलकोट येथेही मुस्लिम अल्पसंख्यांक समाजाला उद्देशून आक्षेपार्ह वक्तव्य करण्यात आले. मुस्लिम अल्पसंख्याक समाजाची दर्गा असो की मशीद त्याला तोडण्यासाठी व त्यावर कब्जे करण्यासाठी सतत प्रशासनावर दबाव तंत्राचा वापर केला जात आहे. मुस्लिम असो की ख्रिश्चन सर्व अल्पसंख्यांक व मागासवर्गीय समाजाच्या विरोधात सतत खालच्या पातळीवर आक्षेपार्ह भाषण करून त्यांना वेठीस धरण्याचा प्रयत्न सुरु असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

ख्रिश्चन समाजाविरोधात मोर्चे काढण्यात आले, वंशाचा मुद्दा पुढे करून मुस्लिम समाजाविरोधात चुकीचे आणि आक्षेपार्ह वक्तव्य करण्यात आले. नुकतेच जवखेडे खालसा येथे हजरत रमजान बाबा दर्गा उर्फ कान्होबा येथे न्यायालयाचा मनाई हुकूम असताना जनसमुदाय आणून दर्गात आरती करण्यात आली. चिथावणी देणाऱ्या भाषणामुळे दर्ग्यावरील हिरवा झेंडा काढून तेथे भगवा झेंडा लावण्यात आला. हिरवी चादर काढून भगवी चादर टाकण्यात आली. हे सर्व कृत्य पोलीस प्रशासनाच्या मदतीने दर्ग्याची विटंबना करण्यात आल्याचा आरोप मुस्लिम समाजाच्या वतीने करण्यात आला.

अशा कृत्यामुळे येणाऱ्या काळात महाराष्ट्रात जातीय दंगल घडविण्याचे षडयंत्र रचले जात आहे. सार्वजनिक कार्यक्रमात मुस्लिम समाजाविरोधात भडकाऊ भाषण करणे, मुस्लिम अल्पसंख्यांक समाजाच्या मालकी जागांवर अतिक्रमणाच्या नावाखाली कारवाई करणे, मुस्लिम धार्मिक स्थळ आणि कब्रस्तान यांच्यावर कारवाई करण्याचे एकीकडे प्रशासनाला निवेदन देणे आणि दुसरीकडे एका विशिष्ट जातीच्या लोकांना व जातीयवादी संघटनेला मुस्लिम अल्पसंख्यांक समाजाच्या धार्मिक स्थळावर हल्ला करण्याचे आव्हान करणे. सदर प्रकार विधानसभा निवडणुकीनंतर सर्रास चालू आहे. ज्या प्रकारे नगर शहर विधानसभेचे आमदार अल्पसंख्यांक मुस्लिम, ख्रिश्चन समाजाविरोधात काम करत आहे, त्यावरून असे दिसते की, हा देश भारतीय संविधानाने चालत असल्याचे आमदार विसरले असून, तुमच्या विचारधारेने चालत नाही. महायुतीचे आमदार संग्राम जगताप हे विकासाचे काम सोडून प्रत्येक मुस्लिम धार्मिक स्थळात मंदिर शोधण्याचे काम करत आहे. मुस्लिम अल्पसंख्यांक समाजाच्या मालकी जागांवर महानगरपालिका आयुक्तांना दर्गा व मजारे तोडण्यासाठी निवेदन देऊन, ते तोडले तर आम्ही तोडू, अशी धमकी देण्याचे काम करत आहे. विशेष म्हणजे हे सगळे होत असताना जिल्हाधिकारी असो व जिल्हा पोलीस अधीक्षक किंवा महानगरपालिका आयुक्त हे नेहमीप्रमाणे कोणतीही प्रतिबंधात्मक कारवाई करत नसल्याचे निवेदनात म्हटले आहे.

संपूर्ण प्रकरणाचा मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे तक्रार करुनही कारवाई झालेली नाही. सर्व बाबी पाहता संबंधित लोकप्रतिनिधी म्हणून आमदारकीची शपथ संविधानावर घेतली असल्याचे विसरले आहे. त्यामुळे संविधानविरोधी कृत्य करत आहे. संविधानविरोधी आणि अल्पसंख्यांक समाजविरोधात आक्षेपार्ह वक्तव्य करणारे आ. संग्राम जगताप यांच्यावर कायदेशीर कारवाई करुन त्यांच्या निलंबनाची मागणी करण्यात आली आहे.



अल–मुस्तफा ॲकॅडमी फॉर कल्चरल ॲण्ड लिटरेचर या संस्थेतर्फे मुनव्वर हुसैन छोटे खान यांना पुरस्काराने गौरविण्यात आले.

# उर्दू कवी मुनव्वर हुसैन यांचा मुंबईत पुरस्काराने सन्मान

नगर – अल–मुस्तफा ॲकॅडमी फॉर कल्चरल ॲण्ड लिटरेचर या संस्थेतर्फे साहित्यिक व शैक्षणिक कामाबद्दल मुनव्वर हुसैन छोटे खान यांना पुरस्काराने गौरविण्यात आले. डॉ. जकरीया ऑडीटोरीयम हॉल, अंजुमन–ए–इस्लाम कॅम्पस, सी.एस.टी. मुंबई येथे झालेल्या या पुरस्कार प्रदान सोहळ्यात सन्मानित करण्यात आले.

यावेळी अंजुमन–ए–इस्लामचे अध्यक्ष पद्मश्री डॉ. जहीर काझी, खतीब–ए–कोकण अली एम. शम्सी, गव्हर्नमेंट पी.जी. कॉलेज बीकानेरचे प्राचार्य प्रोफेसर मोहम्मद हुसैन, मीरठचे प्रोफेसर अस्लम जमशेदपुरी, अमरावतीचे डॉ. अकील अहमद, मुंबईचे असलम गाझी, हैद्राबादचे एफ.एम. सलीम, इक्बाल एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षा डॉ. तबस्सुम नाडकर, मनजूर नाडकर, मुशीर अन्सारी, डॉ. सलीम, सहारनपूरचे तलत सरोहा, उर्दू कारवाँचे अध्यक्ष फरीद खान, शोएब इब्जी आदी उपस्थित होते.

मुनव्वर हुसैन शहरातील सुफी उर्दू कवी हिम्मत अहमदनगरी यांचे नातू आहेत. मुनव्वर हुसैन स्वतः एक चांगले उर्दू कवी असून, ते अहमदनगर उर्दू हायस्कूल व मिसगर ज्यूनिअर कॉलेज मध्ये कार्यरत आहेत.

मुनव्वर हुसेन इदारा अदबे इस्लामी अहमदनगरचे अध्यक्ष आणि इक्बाल एज्युकेशन सोसायटी मुंबईचे उपाध्यक्ष आहे.

## जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी

नगर – जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी दादासाहेब गिते यांनी मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७ (१) (३) अन्वये २८ जून ते ११ जुलै रात्री १२ वाजेपर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी केला आहे. सदर आदेश धार्मिक कार्यक्रम, लग्नकार्य, मिरवणुका किंवा प्रेतयात्रांवरील जमावास लागू राहणार नाही. तसेच पोलीस अधिकारी, कामावर असलेले शासकीय अधिकारी व कर्मचारी, तसेच सभा अथवा मिरवणुका काढण्यासाठी रीतसर परवानगी घेतलेल्या व्यक्तींनाही हा आदेश लागू होणार नाही. या आदेशाचा भंग करणाऱ्यांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

# डॉ. दीपक हरके यांना शांतीदूत रत्न पुरस्कार प्रदान

नगर – शांतीदूत परिवाराचा ६ वा वर्धापनदिन रक्तदान शिबीर, अवयवदान, ध्यान शिबीर अशा विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. पुण्यातील एलओसी हॉस्पिटल, नीलायम सिनेमागृह चौक येथे झालेल्या या कार्यक्रम प्रसंगी देशातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा शांतीदूत रत्न २०२५ ने गौरव करण्यात आला.



प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाचे ध्यानधारणा प्रशिक्षक डॉ. दीपक हरके यांना शांतीदूत पुरस्कार देताना विद्याताई जाधव, तृशाली जाधव, रामदास माने, शिवकुमार साळुंके आदी.

या सोहळ्यामध्ये जगभरात १४३ देशात ८५०० हून अधिक सेवाकेंद्राच्या माध्यमातून निशुल्क ध्यानधारणा शिकविणाऱ्या प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाचे ध्यानधारणा प्रशिक्षक ब्रह्माकुमार डॉ. दीपक हरके यांचा जगभरात भारताच्या प्राचीन राजयोगाचा प्रचार व प्रसार केल्याबद्दल शांतीदूत परिवाराचे सल्लागार माजी विशेष पोलीस महानिरीक्षक महाराष्ट्र राज्य विठ्ठल जाधव यांच्या हस्ते शांतीदूत रत्न २०२५ ने सन्मान करण्यात आला. यावेळी शांतीदूत परिवार संस्थापक विद्याताई जाधव, महाराष्ट्र अध्यक्ष तृशाली जाधव, कार्यक्रमाचे अध्यक्ष उद्योजक रामदास माने, जीएसटी आयुक्त शिवकुमार साळुंके, संत तुकाराम महाराज यांचे थेट वंशज प्रशांतमहाराज मोरे, आयपीएस निखील पिंगळे, अप्पर पोलीस आयुक्त डॉ.रामदास चावरे उपस्थित होते.

# दिव्यांग व्यक्ती व संस्थांनी राष्ट्रीय पुरस्कारासाठी अर्ज करावेत

## १५ जुलैपर्यंत ऑनलाईन अर्ज सादर करा

नगर – सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालयाच्या दिव्यांगजन सशक्तीकरण विभागातर्फे सन २०२५ साठी राष्ट्रीय पुरस्कार दिले जाणार आहेत. जिल्ह्यातील पात्र दिव्यांग व्यक्ती व संस्थांनी १५ जुलैपर्यंत www.awards.gov.in या संकेतस्थळावर अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी प्रशांत गायकवाड यांनी केले आहे.

पुरस्कारासाठी अर्ज गृह मंत्रालयाच्या अधिकृत ऑनलाईन पोर्टलवर पासवर्ड सुरक्षित ठेवून सादर करावे लागणार आहेत. अर्ज विशिष्ट नमुन्यात असून, त्यामधील सर्व मुद्द्यांची माहिती स्पष्ट, उल्लेखनीय व प्रेरणादायी कार्याचे सविस्तर वर्णन देत भरावी. ऑफलाईन अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.

पात्रता निकष, आवश्यक कागदपत्रे व इतर तपशीलांसाठी www.depwd.gov.in आणि www.awards.gov.in या संकेतस्थळांवर माहिती उपलब्ध आहे.

# सहाय्यक पोलिस आयुक्त भाऊसाहेब ढोले पाटील यांना राष्ट्रपती शौर्य पुरस्कार प्रदान

नगर – पनवेलचे सहाय्यक पोलिस आयुक्त भाऊसाहेब ढोले पाटील यांना राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते राष्ट्रपती शौर्य पुरस्कार प्रदान करण्यात आला. मुंबई येथील राजभवनात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

इन्काऊंटर स्पेशालिस्ट अधिकारी म्हणून भाऊसाहेब ढोले हे ओळखले जातात. त्यांच्या नावावर पाच इन्काऊंटर आहेत. गडचिरोली येथे नक्षलवाद्यांशी झालेल्या चकमकीत पाच जणांना त्यांनी जागीच कंठस्नान घातले. त्यांनी यापूर्वी गडचिरोली, पुणे, नवी मुंबई येथे सेवा बजावली आहे. नवी मुंबईत त्यांनी मोठे आर्थिक गुन्हे उघडकीस आणले आहेत. त्यानंतर ते नुकतेच पनवेल येथे सहाय्यक पोलीस आयुक्त म्हणून रुजू झाले आहेत. ढोले पाटील हे अहिल्यानगर जिल्ह्यातील पाथर्डी तालुक्यातील दुलेचांदगाव येथील रहिवासी आहेत. तत्पूर्वी बुधवारी पोलीस महासंचालक कार्यालयाच्या वतीने महासंचालक रश्मी शुक्ला यांच्या हस्ते ढोले यांना महासंचालक पदक प्रदान करण्यात आले. मुंबई येथील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने आमदार शिवाजीराव गर्जे यांच्या हस्ते श्री.ढोले यांचा सत्कार करण्यात आला.



सहाय्यक पोलिस आयुक्त भाऊसाहेब ढोले पाटील यांना राष्ट्रपती शौर्य पुरस्कार प्रदान करण्यात आला.

# जागेवर निवड संधी उपक्रमात ५० उमेदवारांची झाली निवड

नगर – जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योकता मागदर्शन केंद्र, अहिल्यानगर यांच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या जागेवर निवड संधी उपक्रमामध्ये सन फार्मासिटीकल इंडस्ट्रीज प्रा. लि. व पिपाडा व्हिलस प्रा. लि. या दोन कंपन्यांनी ९१ रिक्त पदे अधिसूचित केली होती. नोकरी इच्छुक ७९ उमेदवारांपैकी ५० उमेदवारांची प्राथमिक तर १८ उमेदवारांची अंतिम निवड करण्यात आली असल्याचयी माहिती कौशल्य विकास विभागाचे प्र. सहायक आयुक्त रविकुमार पंत यांनी दिली आहे.

या उपक्रमामध्ये प्र. सहायक आयुक्त रविकुमार पंत, वन अधिकारी एस.बी.कंद यांच्या हस्ते निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्तीपत्राचे वितरण करण्यात आले.

# 'भारत भारती'च्या प्रदेश उपाध्यक्षपदी नगरचे कमलेश भंडारी यांची नियुक्ती



नगर – भारत भारतीच्या महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्षपदी अहिल्यानगरच्या कमलेश भंडारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. बडोदा येथे झालेल्या भारत भारतीच्या राष्ट्रीय अधिवेशनात राष्ट्रीय अध्यक्ष विनय पत्राळे यांनी ही नियुक्ती केली.

अधिवेशनात कमलेश भंडारी यांनी मनोगत व्यक्त करून दिलेल्या जबाबदारीबद्दल आभार मानले. ते म्हणाले, यास्तरावर राष्ट्रहितासाठी काम करणाऱ्या संस्थेने प्रदेश उपाध्यापदाची जबाबदारी देऊन माझ्यावर मोठा विश्वास व्यक्त केला आहे. या माध्यमातून अहिल्यानगर सह पूर्ण राज्यात सामाजिक व राष्ट्रीय एकात्मतेसाठी जास्तीत जास्त काम करत विविध उपक्रम राबवणार आहे.

अहमदनगर मर्चंट्स बँकेचे संचालक असलेले कमलेश भंडारी, जिल्हा जैन ओसवाल पंचायत समाजचे मानद मंत्री, जय आनंद फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष, श्री ऑल इंडिया श्वेतांबर स्थानकवासी जैन कॉन्फरन्स, दिल्लीचे न्याय प्रकाश योजनाचे माजी राष्ट्रीय महामंत्री, दालमंडई तरुण मंडळाचे माजी अध्यक्ष अध्यक्ष अशा विविध पदांवर काम केल आहे.

# भगवान जगन्नाथांची लालटाकी परिसरातून मिरवणूक

नगर – भगवान जगन्नाथांचा रथ उत्सव लालटाकी रोडवरील खाकीदास बाबा मठात अशोक कंत्रोड व डॉ. नंदलाल तोष्णीवाल यांच्या हस्ते भगवान जगन्नाथांची मंगलारती करून लालटाकी परीसरातून मिरवणूक काढण्यात आली. यावेळी चेअरमन दिपक काबरा, शिवदास डागा, चंद्रकांत काबरा, जितेंद्र बिहाणी, मनोज मुंदडा, श्रीकुमार सोनी, श्रीकांत काकाणी, जगदीश दरक, प्रवीण बजाज, ॲड. सुनील मुंदडा आदी उपस्थित होते. दरवर्षी लालटाकी परीसरात रथातून भगवान जगन्नाथाची मिरवणूक काढली जाते.

ओरीसातील जगन्नाथ पुरी येथे भाविकांच्या गर्दीत जगन्नाथ यात्रा सुरु झाली आहे. आज पासून भगवान जगन्नाथ, बलराम आणि सुभद्रेसह नगर भ्रमण करायला निघाले आहेत. यावेळी महिला, पुरूष उपस्थित होते.

## भगवान जगन्नाथांचा रथ उत्सव उत्साहात



भगवान जगन्नाथांचा रथ उत्सव लालटाकी रोडवरील खाकीदास बाबा मठात अशोक कंत्रोड व डॉ. नंदलाल तोष्णीवाल यांच्या हस्ते भगवान जगन्नाथांची मंगलारती करून लालटाकी रोडवरून मिरवणूक काढण्यात आली. (छाया – उदय जोशी)

